


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २६३ ■ गुरूवार, दि. २ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# ‘केंद्रीय दल तैनात करा’



## सर्वोच्च न्यायालयाने बंगाल सरकारला फटकारले

वृत्तसंस्था २ एप्रिल

**नवीदिल्ली :** पश्चिम बंगालमधील मालदामध्ये मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या कामात गुंतलेल्या न्यायिक अधिकाऱ्यांवर झालेल्या दगडफेक आणि लाठीचार्जच्या घटनेची सर्वोच्च न्यायालयाने दखल घेतली आहे. न्यायिक अधिकाऱ्यांच्या संरक्षणासाठी केंद्रीय दल तैनात करण्याचे न्यायालयाने निवडणूक आयोगाला सक्त आदेश दिले आहेत. एसआयआर दरम्यान बंगालमध्ये मतदार यादीतून वगळण्यात आलेल्या सुमारे ५० लाख लोकांचे आक्षेप आणि दाव्यांची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने जिल्हा आणि सत्र न्यायाधीशांची नियुक्ती केली आहे. बुधवारी आंदोलकांनी त्यांच्यावर हल्ला केला. न्यायालयाने या घटनेची दखल घेतली असून यावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल पंचौली यांच्या खंडपीठाने या प्रकरणाची दखल घेतली. आंदोलकांनी न्यायिक अधिकाऱ्यांना दुपारपासून रात्र होईपर्यंत ओलीस ठेवले होते आणि रात्री जेव्हा त्यांनी निघून जाण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांच्या वाहनांवर दगडफेक आणि लाठीचार्ज करण्यात आला. न्यायालयाने या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. न्यायालयाने निवडणूक आयोगाला आदेश दिला की, हे अधिकारी जिथे कुठे राहत आहेत, तिथे त्यांना सुरक्षा पुरवावी. गरज पडली त्यांच्या कुटुंबीयांनाही सुरक्षा पुरवावी. निवडणूक आयोगाने योग्य ती कारवाई करावी आणि राज्य सरकारने आयोगाच्या निर्देशांनुसार कार्यवाही करावी.’ असे स्पष्ट आदेश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात, ‘जिथे दाव्यांचे निराकरण होत आहे, तिथे एका वेळी पाचपेक्षा जास्त लोकांना एकत्र जमण्याची परवानगी देऊ नये.’ असेही म्हटले आहे. खंडपीठाने मुख्य सचिव, डीजीपी, जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना कारणे दाखवा नोटीस बजावली असून, त्यांच्यावर कारवाई का करू नये याचे स्पष्टीकरण मागितले आहे. न्यायालयाने या अधिकाऱ्यांना ६ एप्रिल रोजी होणाऱ्या ऑनलाइन सुनावणीसाठी उपस्थित राहण्याचा आदेशही दिला. न्यायालयाने निवडणूक आयोगाला निर्देश दिले की, या घटनेची चौकशी सीबीआय किंवा एनआयए यांसारख्या निष्पक्ष संस्थेकडून करून घ्यावी. तपास यंत्रणेला आपला अहवाल थेट सर्वोच्च न्यायालयात सादर करण्याचा आदेशही देण्यात आला. सुनावणीदरम्यान, सरन्यायाधीशांनी पश्चिम बंगालच्या महाधिवक्त्यांना फटकारत, ‘दुर्दैवाने, तुमच्या राज्यातील प्रत्येक अधिकारी राजकीय भाषा बोलतो. दंगलखोर कोण होते हे आम्हाला माहीत नाही असे तुम्हाला वाटते का?’ मी पहाटे २ वाजेपर्यंत परिस्थितीचा आढावा घेत होतो.? असे म्हणत चांगलेच खडसावले. न्यायमूर्ती बागची यांनी यावर उत्तर देताना, ‘आम्ही तुमच्या विनंतीचा विचार करू, पण हे लक्षात घ्या की ही टिप्पणी तुमच्यासाठी एक आव्हान आहे.’ ते चुकीचे सिद्ध करा. असे आव्हान दिले आहे.



सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी सांगितले की, मालदाचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक (डीएम) आले नाहीत. उच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांनी पोलीस महासंचालकांशी (डीजीपी) संपर्क साधला आणि त्यानंतरच न्यायिक अधिकाऱ्यांना रात्री उशिरा निघता आले, तरीही त्यांच्यावर दगडफेक झाली. त्यांनी सांगितले की, हे केवळ न्यायिक अधिकाऱ्यांच्या छळाचे प्रकरण नाही तर हे सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकाराला दिलेले आव्हान आहे. सरन्यायाधीशांनी याविषयी बोलताना, ‘उच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांनी कळवले होते की मुख्य सचिवांचा नंबर व्हॉट्सॲपवर उपलब्ध नव्हता. या घटनेच्या स्वरूपामुळे न्यायिक अधिकाऱ्यांच्या मनोधैर्यावर परिणाम होऊ शकतो’ असे स्पष्टपणे नमूद केले आहे. टीएमसीच्या वकिलांनी जबाबदार अधिकाऱ्यांकडून वैयक्तिक प्रतिज्ञापत्रे मागवण्याची मागणी केली. एसआयआरला आव्हान देणाऱ्या याचिकाकर्त्यांचे प्रतिनिधित्व करणारे ज्येष्ठ वकील कपिल सिबल हे देखील न्यायालयात उपस्थित होते. राज्यात कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे, ही टिप्पणी काढून टाकण्याची सिबल यांनी सरन्यायाधीशांना विनंती केली.

## ठाकरेंचे खासदार शिंदेसेनेच्या डिनरला!

**मुंबई :** शिवसेना शिंदे गटाच्या डिनेर डिप्लोमसीला शिवसेना ठाकरे गटाच्या दोन खासदारांनी उपस्थिती लावल्याने राज्याच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी डिनर आयोजित केले होते. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे खासदार नागेश आष्टीकर आणि संजय देशमुख उपस्थित होते. महाराष्ट्रात ऑपरेशन टायगरच्या चर्चा सुरू असतानाच शिवसेना ठाकरे गटाचे नांदेडचे खासदार नागेश आष्टीकर आणि यवतमाळ-वाशिमचे खासदार संजय देशमुख यांनी प्रतापराव जाधव यांच्या स्नेहभोजनाला उपस्थिती लावली.



नांदुरा येथील १०५ फूट हनुमान मूर्ती समोर हनुमान जयंती उत्साहाने साजरी करण्यात आली. हजारो भाविकांनी महाकाय हनुमंताचे दर्शन घेतले. मूर्ती स्थापनेचे पंचवीसावे वर्ष असल्याने भव्य आयोजन करण्यात आले आहे. बुलडाणा जिल्ह्यातील नव्हे तर विविध ठिकाणचे भक्त दर्शनासाठी येतात. गुरूवारी सकाळ पासून भाविकांची गर्दी होती.

# 40 पेट्रोकेमिकल्सवरील आयात शुल्क माफ!

## ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर सरकारचा निर्णय

वृत्तसंस्था २ एप्रिल

**नवी दिल्ली :** इराण आणि अमेरिकेतील युद्ध थांबायचं नाव घेत नाही. डोनाल्ड ट्रम्प यांनी तळयात-मळयात विधान करून पुन्हा एकदा जगायचे टेन्शन वाढवले असताना या संकट काळातील स्थिर पुरवठा आणि तयार वस्तूंच्या ग्राहकांवरील बोजा हलका करण्यासाठी, सरकारने गुरुवारी महत्त्वाच्या पेट्रोकेमिकल उत्पादनांच्या आयातीवरील सीमाशुल्क पूर्णपणे हटवले आहे. आता कच्च्या मालाचा खर्च कमी झाल्याने उत्पादन खर्चात घट होण्याची शक्यता असून यामुळे अंतिम उत्पादनांच्या किमती कमी होऊन ग्राहकांना दिलासा मिळू शकतो.

इराणच्या युद्धामुळे निर्माण झालेल्या तेल संकटादरम्यान देशांतर्गत उद्योगांना दिलासा देण्यासाठी भारत सरकारने ४० महत्त्वपूर्ण पेट्रोकेमिकल उत्पादनांवरील सीमा शुल्क पूर्णपणे माफ केले आहे. २ एप्रिल रोजी अर्थ मंत्रालयाने या संदर्भात एक आदेश जारी केला ज्याचा मुख्य उद्देश कच्च्या मालाच्या किमतीत होणाऱ्या प्रचंड वाढीपासून भारतीय उत्पादन क्षेत्राचे संरक्षण करण्याचा असून सरकारच्या म्हणण्यानुसार या उत्पादनांवरील सीमा शुल्कातील सूट ३० जून २०२६ पर्यंत लागू राहील.(जवळपास प्रत्येक उद्योगात पेट्रोकेमिकल्सचा वापर केला जातो त्यामुळे आता सरकारच्या या निर्णयामुळे प्लॅस्टिक, पॅकेजिंग, वस्त्रोद्योग, औषधनिर्माण, ऑटोमोबाईलचे सुटे भाग आणि रासायनिक उत्पादन यांसारख्या क्षेत्रांना मोठा दिलासा मिळाला असेल. आयात शुल्क पूर्णपणे माफ केल्यामुळे या उद्योगांचा उत्पादन खर्च कमी होईल आणि भाववाढ करायची गरज पडणार नाही. ज्यामुळे सर्वसामान्य माणसावरील महागाईचा भार कमी होऊ शकेल.

# 71 लाख महिलांचा 1500 रूपयांचा हप्ता कायमचा बंद!

## गत 20 महिन्यांपासून मिळत होता लाभ, ई-केवायसीत झाल्या बाद

प्रतिनिधी २ एप्रिल

**मुंबई :** राज्यात विधानसभा निवडणुकीपासून सुरू झालेल्या ’लाडकी बहीण’ योजनेतील लाभार्थी महिलांच्या ई-केवायसी प्रक्रियेत ७१ लाख महिला अपात्र ठरल्या आहेत. या महिलांनी ई-केवायसी केले नसल्याने त्या या योजनेत बसत नव्हत्या हे स्पष्ट झाले आहे.

या लाडकी बहीण योजनेचा फटका काही प्रमाणात इतर योजनांना देखील बसला होता. राज्याची आर्थिक घडी या योजनेमुळे काहीशी विस्कटल्याने अपात्र महिला शोधण्याची मोहीम महिला व बालकल्याण विभागाने राबवली होती. अनेक शासकीय कर्मचारी, महिलांच्या नावे काही पुरूष देखील या योजनेचा लाभ घेत असल्याचे समोर आले होते.

### १ कोटी ९० लाख महिलांनी केली ई-केवायसी

आतापर्यंत १ कोटी ९० लाख लाभार्थींनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे, यातील १ कोटी ७५ लाख बहिणी पात्र ठरल्या आहेत तर यात अनेक महिला अपात्र ठरल्याचे मार्च अखेरपर्यंत समोर आले आहे. मात्र ७१ लाख महिलांना मागील २० महिन्यांपासून १५०० रुपये अनुदान सुरु असल्याने महिन्याला ही रक्कम १०६५ कोटींच्या घरात आहे. त्यामुळे आतापर्यंत सरकारचे साधारणपणे २१ हजार ३०० कोटी रुपये अपात्र लाडक्या बहिणींना अनुदान देण्यामध्ये खर्च झाल्याचे समजते आहे.

### ई-केवायसीला मुदतवाढ

लाडकी बहीण योजनेत ई-केवायसी करताना चुकीचा पर्याय निवडलेल्या लाभार्थींना आता दुरुस्तीसाठी ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. आधी ही मुदत ३१ मार्चपर्यंत होती. ई-केवायसी दुरुस्तीसाठी ही शेवटची संधी असेल असे महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी सांगितले.

### सरकारी तिजोरीवर ४३ हजार ७४० कोटींचा बोजा!

लाडकी बहीण योजनेमुळे सरकारी तिजोरीवर बोजा वाढला होता. तसेच अनेक अपात्र महिलांनाही लाभ होत असल्याने ई- केवायसीची प्रक्रिया राबविण्यात आली. या योजनेत २ कोटी ४३ लाख महिलांनी नोंदणी केली होती आणि त्यांना दरमहा १,५०० रुपये मदत मिळत होती. त्यामुळे सरकारी तिजोरीवर वर्षाला ४३,७४० कोटी रुपयांचा बोजा येत होता.

# राष्ट्रवादीचे ३० आमदार भाजपमध्ये प्रवेश करणार

प्रतिनिधी २ एप्रिल

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात लवकरच मोठा भूंकप होण्याचे संकेत उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी दिले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिंदे शिवसेनेतील अनेक आमदार भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत, असा मोठा दावा संजय राऊत यांनी केला आहे. या दाव्यानंतर राजकारणात मोठी खळबळ उडाली असून, राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रतिक्रिया समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते मंत्री हसन मुश्रीफ यांनी राऊतांच्या दाव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील ३० आमदार पुढच्या काही महिन्यात भाजपमध्ये विलिन होतील, असा दावा संजय राऊतांनी केला आहे. यावर हसन मुश्रीफांनी एकाच वाक्यात प्रतिक्रिया देत तशी शक्यता नसल्याचे वक्तव्य केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा एकही आमदार अजित दादांचा पक्ष



सोडून जाणार नाही, असे हसन मुश्रीफांनी म्हटले आहे. तसेच संजय राऊतांनी केलेल्या दाव्यावर त्यांनी जोरदार टोला लगावला आहे. संजय राऊतांनी आपले खासदार सांभाळावेत तेच बरेचशे चालले आहेत अशा बातम्या आम्ही ऐकलेल्या आहेत, असे मुश्रीफ म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात घटना बदलावरुन संघर्षाचे वारे वाहू लागले असल्याची चर्चा आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार दिल्ली दौऱ्यावर गेल्या आहेत. त्यांच्या दिल्ली दौऱ्यात पक्षातील कोणताही ज्येष्ठ नेता नाही. त्या भाजप नेते केंद्रीय मंत्री अमित शाह यांची भेट घेणार असल्याची शक्यता आहे. त्यामुळे विविध चर्चांना उधाण आले आहे.

# दुचाकी अपघातात एक ठार

प्रतिनिधी २ एप्रिल

**खामगाव :** दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात एका युवकाचा मृत्यू, तर तिघे गंभीररित्या जखमी झाल्याची घटना रात्री घडली. जळगाव जामोद नांदुरा रोडवर आसलगाव-खांडवी दरम्यान हा अपघात झाला. नांदुऱ्याकडून आसलगावकडे येत असताना हॉटेल रायबासमोर एमचएच-२८, सीए २९३८ व एमएच- २०, एआर ५०४७ या क्रमांकाच्या दुचाकींमध्ये जोरदार धडक झाली. या अपघातात आसलगाव येथील विकी प्रवीण मोरे (२१) याचा जागीच मृत्यू झाला. नितीन कैलास पाखरे (२५, रा. आसलगाव) गंभीर जखमी असून, त्याला खामगाव येथे हलविले. दुसऱ्या दुचाकीवरील अमित ढवळे (४०) व त्यांचा सहप्रवाशीही गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर खामगाव येथे उपचार सुरू आहेत. नांदुरा-जळगाव मार्गावरील राष्ट्रीय महामार्ग १६१ वर अपघातांची मालिका सुरूच आहे.

# विधान परिषदेसाठी भाजपमध्ये इच्छुकांची भाऊगर्दी!

प्रतिनिधी २ एप्रिल



**मुंबई :** राज्यातील राजकारण आता आगामी विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा तापू लागले आहे. १३ मे २०२६ रोजी विधान परिषदेच्या ९ सदस्यांचा कार्यकाळ संपत असून, या रिक्त होणाऱ्या जागांसाठी राजकीय मोर्चेबांधणीला वेग आला आहे. एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात या निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता असल्याने भाजपमध्ये उमेदवारी मिळवण्यासाठी मोठी चढाओढ सुरू झाली आहे.

विधानसभेतील सध्याचे संख्याबळ पाहता, भाजपचे ५ उमेदवार निवडून येऊ शकतात. मात्र, पक्षाकडे इच्छुकांची यादी खूप मोठी आहे.

### हे नऊ सदस्य होणार निवृत्त!

भाजपचे रणजितसिंह मोहिते-पाटील, संजय केनकर, संदीप जोशी, दादाराव केचे, उद्धव ठाकरे (शिवसेना उबाठा), नीलम गोऱ्हे (शिवसेना), शशिकांत शिंदे (राष्ट्रवादी शप), अमोल मिटकरी (राष्ट्रवादी काँग्रेस), राजेश राठोड हे सदस्य विधान परिषदेतून निवृत्त होणार आहेत.

### उद्धव ठाकरेंच्या उमेदवारीवर सस्पेन्स

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचाही कार्यकाळ १३ मे रोजी संपत आहे. महाविकास आघाडीच्या वाट्याला केवळ एकच जागा येणार असल्याने, ती जागा उद्धव ठाकरेंसाठी सोडली जाणार का? ठाकरे गटाचे २० आमदार असल्याने त्यांचा या जागेवर दावा आहे, मात्र काँग्रेस आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी काय भूमिका घेते? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# देशभरात 15 वर्षांनंतर जनगणनेला प्रारंभ!

## दोन टप्प्यात होणार जनगणना · 33 प्रश्नांची राहणार यादी

वृत्तसंस्था २ एप्रिल

**नवी दिल्ली :** देशातील सर्वात मोठ्या प्रशासकीय प्रक्रियापैकी एक असलेल्या जनगणनेला १ एप्रिलपासून प्रारंभ होत आहे. तब्बल १५ वर्षांनंतर देशात जनगणना होणार असून, ही प्रक्रिया आता डिजिटल पद्धतीने पार पडणार आहे. सोबतच ही जनगणना दोन टप्प्यांत पार पडणार असल्याची माहिती आहे. पहिल्या टप्प्यात घरगुती आणि गृहनिर्माण माहिती गोळा केली जाईल. १ एप्रिलपासून नागरिकांना स्वयं-नोंदणीची सुविधा उपलब्ध होईल, तर १६ एप्रिलपासून अधिकारी घराघरात जाऊन माहिती संकलन करतील. घराची स्थिती, पाणी, वीज, स्वच्छता आणि मालमत्ता यांची माहिती यामध्ये घेतली जाणार आहे. दरम्यान, दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्येची सविस्तर माहिती नोंदवली जाईल. यामध्ये वय, शिक्षण, व्यवसाय, स्थलांतर यासह जातीनिहाय माहिती देखील गोळा केली जाणार आहे.



### लीव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्यांना मानले जाईल विवाहित

एप्रिल ते सप्टेंबर २०२६ दरम्यान पहिला टप्पा पार पडणार असून, देशातील ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश, ६.३ लाखांहून अधिक गावे यांचाही समावेश असेल. सोबतच लीव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्यांना विवाहित मानले जाणार असल्याचा मोठा निर्णय देखील या संदर्भात घेण्यात आला आहे. एकूण ३३ प्रश्न यंदा जनगणनेसाठी निश्चित केले आहेत.

### जनगणनेचे महत्त्व

जनगणनेतून जी माहिती उपलब्ध होईल ती धोरण ठरवण्यासाठी आणि सार्वजनिक प्रशासनासाठी फायदेशीर होईल. लोकसभा, विधानसभा, स्थानिक स्वराज संस्थांच्या मतदारसंघोंच्या फेररचनेसाठी आणि आरक्षण निश्चितीसाठी जनगणनेच्या डेटाचा वापर होईल. संशोधकांना देखील या माहितीचा फायदा होईल.

## अशोक खरातला सात दिवसांची पोलीस कोठडी!

प्रतिनिधी २ एप्रिल

**नाशिक :** शेकडो महिलांचे लैंगिक शोषण आणि आर्थिक फसवणुकीचा आरोप असलेला नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. पहिल्या गुन्ह्यातील कोठडी संपल्यानंतर, दुसऱ्या बलात्कार प्रकरणात त्याला आज न्यायालयाने ८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. सुरक्षेच्या कारणास्तव खरातला न्यायालयात प्रत्यक्ष हजर न करता व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) द्वारे हजर करण्यात आले होते.



सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
गुरुवार, दि. २ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com



# रील संस्कृती, स्क्रोलपासून समाजापर्यंत

*इंस्टाग्राम रील, यूट्यूब शॉर्ट्स आणि टिकटॉक सारख्या लघु-स्वरूपाच्या आता सध्या टिकटॉक जरी बंद असले तरी त्याचा उल्लेख होणे गरजेचे आहे. या सर्व व्हिडिओंनी गेल्या काही वर्षांत जगभरातील डिजिटल संवादाचे स्वरूपचं बदलून टाकले आहे. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या समृद्ध देशात जिथे हजारो भाषा, असंख्य सांस्कृतिक परंपरा आणि जगातील सर्वात महान अशी लोकशाही आहे. तिथे रील्सनी केवळ मनोरंजनाचे साधन म्हणूनच नव्हे तर राजकीय प्रचार, सामाजिक बदल, सांस्कृतिक अभिव्यक्ती आणि शैक्षणिक प्रसाराचे एक प्रभावी माध्यम म्हणून काम करण्यास सुरुवात केली आहे.*

रील्स हे असं माध्यम आहे ज्यामुळे ज्या व्यक्ती मध्ये मुळात चं टॅलेंट आहे त्या टॅलेंट ला वाव मिळतो. जी कला, प्रोजेक्ट, कंटेट ते ३० ते १.०० मी. च्या कालावधीत सादर करतात त्याला देखील कल्पकता लागते. आपली कला सादर करण्याचे हे अत्यंत स्वस्त साधन आहे. यासाठी तुम्हाला स्मार्ट फोन आणि इंटरनेटची आवश्यकता असते. आजकाल तर डेटा चे इतके फॅड झाले की, एकदा घरी भाकर खायला नसली तरी चालेल पण मोबाईल मध्ये डेटा पॅक पाहीजे. भविष्यात चार मूलभूत गरजांपैकी पाचवी गरज मोबाईल डेटा ही असेल यात तिळमात्र शंका नाही.

या रील्स च्या माध्यमातुन अनेक दुर्लक्षित परंतु दमदार कसदार कंटेट असणाऱ्यांना प्लॅटफॉर्म मिळाला हे विशेष त्यापैकी काही उदाहरणे पुढीलप्रमाणे १)अर्शदीप सिंग भारतीय क्रिकेटपटू क्रिकेटसोबतच इंस्टाग्रामवर विनोदी रील्स करण्यासाठी प्रसिद्ध.

२)सुरज चव्हाण मराठी अभिनेता, इन्फ्लुएंसर 'बिग बॉस मराठी'चा विजेता. त्याची 'जस्टिन बीबर'शी केलेली तुलना आणि त्याचे विनोदी रील्स यामुळे तो चर्चेत आला.

३)रियाज अली, फॅशन लाइफस्टाइल इन्फ्लुएंसर हा युवा कलाकार इंस्टाग्राम रील्सद्वारे फॅशन आणि लाइफस्टाइल कंटेंटसाठी ओळखला जातो.

४)फैसल शेख (मिस्टर फैसू) अभिनेता, इन्फ्लुएंसर सिनेमॅटिक स्टाईल आणि व्हायरल स्टोरीटेलिंगसाठी प्रसिद्ध.

५)शशिकांत गुप्ता, डिजिटल क्रिएटर, उद्योजक उत्तर प्रदेशातील गोरखपूर येथील हा युवा क्रिएटर इंस्टाग्रामवर मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाला. अलीकडेच त्याला देशातील टॉप २० डिजिटल क्रिएटर्समध्ये स्थान मिळाले.

६)अरुण तुपे, मराठी कॉमेडी इन्फ्लुएंसर 'व्दर्ह्ब्ल्हूल्ज' या अकाउंटवर तो रोजच्या जीवनातील विनोदी व्हिडीओसाठी प्रसिद्ध होता. दुर्दैवाने नुकताचं २०२६ मध्ये त्याचे निधन झाले. त्याची शेवटची रील चांगलीच व्हायरल झाली होती.

७)पुजारिणी प्रधान, लाइफस्टाइल क्रिएटर आपल्या गोंधळलेल्या स्टोरीटेलिंगसाठी ओळखली जाते.वास्तववादी कंटेंटला महत्त्व देणाऱ्यांमध्ये तिची गणना होते.

सध्या राजकीय पक्ष आणि नेते नविन तंत्रज्ञानाचा अवलंब करुन कमी वेळात जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी सोशल मीडिया चा वापर सर्रास करताना दिसुन येतात सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याला ते प्राधान्य देत आहेत. मिशिगन विद्यापीठाच्या संशोधक जॉयोजित पाल यांच्या अभ्यासानुसार भारतातील राजकीय प्रभाव आता वृत्तवाहिन्यांपासून दूर जाऊन

क्रिएटर-चालित जगामध्ये स्थलांतरित होत आहे . २०१४ च्या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात सोशल माध्यमाचा वापर केला आहे. हे आपणा सर्वांना चं सर्वश्रुत आहे. २०२४ च्या झेफ्मो अहवालानुसार, ७८ज्ञ् प्रतिसादकर्ते (फॉलोअर) इन्फ्लुएन्सर मार्केटिंगला सार्वजनिक आणि राजकीय जागरूकता निर्माण करण्याचे प्राथमिक साधन मानतात. स्थानिक भाषा, विनोद आणि सांस्कृतिक संदर्भ वापरून सूक्ष्म-इन्फ्लुएन्सर (स्म्दि-ग्हत्तिलहमे) आपल्या समुदायांशी अधिक घनिष्ठ नाते निर्माण करतात. बिहार, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या राज्यांमधील निवडणुकांमध्ये अशा स्थानिक क्रिएटर्सनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी सरकारने

२३ क्रिएटर्सना राष्ट्रीय क्रिएटर पुरस्कार देऊन गौरवले. डिकोडच्या तपासणीत असे आढळले की या पुरस्कारांच्या सोशल मीडिया प्रचारासाठी सरकारने २.४ कोटी रुपयांहून अधिक खर्च केला होता. काही राज्य सरकारांनी मोठ्या फॉलोअर्स असलेल्या क्रिएटर्सची नोंदणी करण्यासाठी धोरणे आखली होती.

अकादमीया एडूवर प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात ५० रील्सचे परीक्षण करण्यात आले. या अभ्यासात असे आढळले की, व्हिज्युअल घटक धार्मिक विभाजनाला कारणीभूत ठरण्याच्या उद्देशाने तयार केले जातात. बऱ्याचदा खोटी माहिती सत्य म्हणून सादर केली जाते. आणि भारतीय राजकीय व्यक्तिमत्त्वांना धार्मिक विचारधारांशी जोडले जाते . या अभ्यासानुसार अशा सामग्रीचा जनमतावर प्रचंड प्रभाव पडण्याची शक्यता जास्त आहे.

सामाजिकदृष्ट्या विचार केला असता रील्स बघणे हा लहाणापासुन ते म्हाताऱ्या व्यक्तींपर्यंतचा सर्वांचा आवडता विषय झालेला आहे. सध्याच्या काळात रील्स बघणे हे जणू व्यसन चं झाले आहे. कारण कोणतीही गोष्ट अतिप्रमाणात झाली की ती घातक चं असते मग ते टिव्ही बघणे असो की जेवन सर्व लिमिट मध्ये पाहीजे. त्यामुळे या नव्या व्यसनापासुन देखील सर्वांनी अंतर ठेवले पाहीजे. इंडोनेशियातील ग्रामीण समुदायांवरील अभ्यास दर्शवितो की व्हायरल कंटेट चा पारंपारिक मूल्ये आणि पिढ्यांमधील संबंधांवर सखोल परिणाम होतो . हे निष्कर्ष भारतीय संदर्भातही तितकेच लागु पडतात. अभ्यासानुसार असे आढळले की, काही कंटेट शिक्षण आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देत असली तरी बरेचं कंटेट समाजासाठी घातक असतात याचे भाण ठेवणे आवश्यक आहे. कंटेट निर्माते अनेकदा नैतिकतेपेक्षा लोकप्रियतेला प्राधान्य देतात. पालक आणि शिक्षक तरुणांच्या स्क्रीन टाइमवर नियंत्रण ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत असतात. रील्स च्या माध्यमातुन सत्य लोकांसमोर येणे आवश्यक असते परंतु मोठ्या प्रमाणावर अफवा किंवा खोटी माहीती पसरविण्याऱ्यांना आपण रोखणे आवश्यक असते. अनेक सामाजिक चळवळी रील्सच्या माध्यमातून प्रभावीपणे पुढे गेल्या आहेत. बिहारमध्ये सूक्ष्म-इन्फ्लुएन्सर्सनी स्किट्स आणि डान्स रील्सच्या माध्यमातून युवा मतदार नोंदणीला प्रोत्साहन दिले. नागपूरमध्ये स्थानिक क्रिएटर्सनी स्थानिक स्वराज्य संस्थांशी हातमिळवणी करून मिम्स आणि लघु व्हिडीओंच्या माध्यमातून मतदार जागरूकता वाढवली. डिजीटल युगात रील्स मुळे अनेक रोजगार उपलब्ध झाले आहेत. त्यापैकी निवडणुकीचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी अनेक तरुण आता रील्स चा वापर करुन प्रोजेक्ट घेवुन सर्व्हे करत आहेत.

गेल्या काही वर्षांत लोकांनी चित्रपट अभिनेत्यांपासून दूर जाऊन कंटेट क्रिएटर्सकडे पाहण्यास सुरुवात केली आहे.

साहित्य, कवीता, शायरी, गायन, शैक्षणिक अशाप्रकारचे रील्स बनवणारे आज खुप लोकप्रिय झाले आहेत. हे जरी असले तरी राजकीय किंवा सामाजिकदृष्ट्या संवेदनशील विषयांवर बोलणाऱ्या क्रिएटर्सना ट्रोलिंग आणि ऑनलाइन अत्याचाराला सामोरे जावे लागते.

रील्सनी स्थानिक संस्कृतींना जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. बोलीभाषा, स्थानिक विनोद, पारंपारीक पोशाख आणि खाद्यपदार्थ यांचे सादरीकरण रील्सच्या माध्यमातून केले जाते. उत्तर प्रदेश पर्यटन विभागाने अयोध्येला पर्यटन स्थळ म्हणून प्रचारित करण्यासाठी क्रिएटर्ससोबत संपर्क साधुन प्रचार आणि प्रसार केला. ज्यामुळे स्थानिक इन्फ्लुएन्सरला व अर्थव्यवस्थेलाही चालना मिळाली . हे सर्व असतांना भाषेबाबतचा प्रामाणिकपणा आपण जपला पाहीजे. आपली बोलीभाषा, सोबत प्रमाणभाषा आपण जतन करणे आवश्यक आहे. सामाजिक माध्यमांवरील धार्मिक कंडेट चे परिणाम दुधारी ठरतात. एकीकडे अनेक धार्मिक गुरू आणि संस्था रील्सच्या माध्यमातून आध्यात्मिक ज्ञानाचा प्रसार करतात. दुसरीकडे अभ्यास असे दर्शवितात की काही रील्स धार्मिक अल्पसंख्याकांविरुद्ध भेदभाव वाढवण्याच्या उद्देशाने तयार केल्या जातात .भारतासारख्या धार्मिक आणि विविधतेने समृद्ध देशात अशा कंटेट मुळे सामाजिक स्थैर्यावर गंभीर परिणाम होतांना आपण पाहत आहोत. अशावेळी आपण आपल्या सद्सद्विवेक बुद्धीचा वापर करणे आवश्यक आहे. आपल्या धडावर डोके आहे. आपल्याला बुध्दी आहे. विचार आहेत आपण शिकलो आहोत. त्यामुळे काय स्वीकारलं पाहीजे काय नाकारलं पाहीजे याचे भाण प्रत्येकाला असणे आवश्यक आहे. यासाठी मुळ पुस्तके, संदर्भग्रंथ आपण वाचले पाहीजे. वाचण फार आवश्यक आहे. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटलेचं आहे.

'वाचाल तर वाचाल' हे वाक्य इतकं सोप्पं नाही फार मोठा अर्थ यामध्ये दडला आहे.

प्रा. राहुल गोवर्धन माहुरे
शांतीनगर, जुनेशहर, अकोला
मो.९८२२२७८९२५

रील्सनी शिक्षण क्षेत्रातही क्रांती घडवली आहे. सायन्स डायरेक्ट वर प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार अनेक भाषा शिक्षक आज इंस्टाग्राम, यूट्यूब सारख्या विचारपिठावर लघु व्हिडिओंच्या माध्यमातून व्याकरण, उच्चार, शब्दसंग्रह, वाक्प्रचार आणि सांस्कृतिक पैलू शिकवतात. अशा शिक्षकांना 'एजुकेशन इन्फ्लुएन्सर्स' किंवा 'मायक्रोसेलिब्रिटी टीचर्स' असे संबोधले जाते. या रील्समुळे आणि कोरोना मुळे ?नलाईन शिक्षणाला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. अनेक शिक्षक अभ्यासपूर्ण कंटेट आणि शिकविण्याची विशिष्ट शैली यामुळे अनेक शिक्षक प्रसिद्ध झाले. जसे

प्रा. विकास दिव्यकिर्ती, प्रा. खान सर,प्रा.ओझा सर, शालिनी सिंग, प्रशांत किरड, संजय अप्पन, आशू घई, धिरज टाकरी, दीपाली दाहीकंबळे, प्रा. विठ्ठल कांगणे,

प्रा. नितेश कराळे आणि अनेक शिक्षकांचा समावेश आहे. शैक्षणिक रील्स ह्या विद्यार्थ्यांना सत्याच्या आणि प्रासंगिक भाषेच्या संपर्कात आणतात.

जे औपचारिक शिक्षणाच्या पद्धतींमध्ये अनेकदा मर्यादित असते . सोशल मीडियावरील कंटेट चे बहुविध स्वरूप जसे मजकूर, प्रतिमा, ध्वनी यांचे संयोजन यामुळे शिक्षण अधिक गतिमान होत आहे. मात्र शिक्षणासाठी रील्सचा वापर करताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते.


राजकीय प्रचारापासून ते सामाजिक आणि सांस्कृतिक बदला सोबत अभिव्यक्तीपासून ते शिक्षणापर्यंत रील्सने भारतीय समाजाच्या सर्वचं स्तरावर अमीट ठसा उमटवला आहे. हे माध्यम अप्रतिम संधीही देते आणि गंभीर आव्हानेही उभी करते. रील्समुळे राजकीय

आणि सामाजिक जागरूकता आणि शिक्षण प्रभावीपणे मांडता येते. स्थानिक संस्कृतींना जागतिक विचारपिठ मिळते. जसे फायदे तसेचं काही तोटे सुध्दा आहेत जसे चुकीची माहिती आणि दुष्प्रचार वेगाने पसरतो, सांप्रदायिक कंटेट मुळे सामाजिक तणाव निर्माण होऊ शकतो, पाश्चात्य संस्कृतीच्या वर्चस्वामुळे स्थानिक परंपरा मागे पडण्याची शक्यता असते, शैक्षणिक सामग्रीची गुणवत्ता धोक्यात येऊ शकते. यासाठी डिजीटल साक्षरते बरोबर चं माध्यम साक्षरतेची (स्ी र्तुीम्ब्) गरज आहे. सुजाण नागरिकांनी रील्समधील कंटेटचे समीक्षणात्मक मूल्यमापन करण्याची आवश्यकता आहे. शैक्षणिक संस्थांनी रील्स सारख्या नव्या माध्यमांचा शिक्षणासाठी कसा प्रभावी वापर करता येईल यावर संशोधन आणि प्रयोग करणे आवश्यक आहे.रील्स ही केवळ एक तांत्रिक सुविधा नसून ती समकालीन भारतीय समाजाचे प्रतिबिंब आहे. या माध्यमाचा वापर कसा केला जातो. यावरचं आपल्या लोकशाहीचे सामाजिक स्थैर्य, सांस्कृतिक विविधता आणि शैक्षणिक प्रगतीचे भवितव्य अवलंबून आहे.

# राजकारण हेच फक्त सामाजिक कार्याचे व्यासपिठ नाही

*व्यक्तीगत तसेच संघटना स्तरावर सामाजिक कार्य करणारे अनेक आहेत. कुठलाही गाजावाजा न करता, प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता निस्वार्थीपणे भरिव सामाजिक काम करणारे बरेच व्यक्ती आणि संघटना देशात आहेत. सामाजिक कार्य करणे वाटते तितके सोपे नाही. आपण समाजाचे काही देणे लागतो याची आंतरिक जाणीव ज्याला असते, तीच व्यक्ती अत्यंत तळमळीने सामाजिक कार्य करू शकते.*

त्याला कुठलेही नेतृत्व, मंच, संघटना अथवा पक्षाची आवश्यकता नसते. सामाजिक कार्याची आवड असणारी व्यक्ती स्वतःला कार्यात झोकून घेते त्याची प्रामाणिक तळमळ बघून लोकं आपोआप जोडल्या जातात. अथवा एखादी संघटना त्याला आपल्यात सामावून घेते. अश्या पद्धतीने कार्य सुरू राहते. असे लोक समाजाला काही देतातच, काही मिळण्याची अथवा परताव्याची अपेक्षा ठेवत नाही. सामाजिक समस्या अनंत आहेत, या क्षेत्राची व्याप्ती प्रचंड आहे. असे असतांनाही कार्यकर्ते आणि संघटनांची वानवा जाणवते आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गाडगे महाराज हे जन्मतः सामाजिक कार्यकर्ता होते. त्यांच्या पाठीशी कार्यकर्त्यांची कुठलीही फौज नव्हती, गाठिशी पैसा नव्हता. कुठलीही व्यक्ती, पक्ष वा संघटनेचे पाठबळ नव्हते. अनंत त्रास सोसून त्यांनी सामाजिक कुप्रथा आणि समस्यांसाठी संघर्ष केला. त्यांचं कार्य आजही कार्यकर्ते जोमाने पुढे नेत आहेत. यालाच म्हणतात निस्वार्थ कामाची पावती.



राज्यात महानगरपालिका निवडणूकीचे मतदान झाले असून निकाल देखील जाहीर झाले आहेत. यावेळी सर्वच प्रमुख पक्षांनी त्यांच्या काही कार्यकर्त्यांना उमेदवारी नाकारल्यामुळे नाराजी उफाळून आली. उमेदवारी नाकारल्याचे कळल्यावर काहीजण भोवळ येऊन पडले, काहींची प्रकृती बिघडली तर काही ओक्साबोक्शी रडले. आम्हाला समाजसेवा करायची होती. परंतु पक्षानी उमेदवारी नाकारुन आमची ठसामाजिक कारकिर्दठ, संपवली असे विचार अनेकांनी व्यक्त केले. यामुळे सामाजिक कार्य करण्यासाठी महापालिकेत निवडून जाणेच आवश्यक आहे का? तसेच महानगरपालिका सामाजिक कार्याचे विद्यापीठ आहे का? असा प्रश्न मनात उपस्थित होतो. बोटावर मोजण्या इतके लोकप्रतिनिधी सोडले तर, निस्वार्थीपणे सामाजिक कार्य केल्याचे दिसून येत नाही. ज्यांना समाजकार्याची तळमळ आहे. अश्यांनी निवडणूक लढविण्यात आपली आर्थिक, मानसिक आणि शारीरिक शक्ती न गमावता, स्वतः ला सामाजिक कार्यात झोकून द्यावे. इतके लोकं जर तन, मन आणि धनाने या कामात उतरले तर, समाजाचा कायापालट होणे निश्चित आहे. राजकारणा मुळे समाजात ओळख निर्माण होवून पद आणि प्रतिष्ठा मिळते असा सर्वसामान्यांचा समज आहे. परंतू थंड डोक्याने विचार केल्यास, राजकारणात प्रगती झालेले भाग्यवंत किती आहेत? राजकारण हे मायाजाल आहे. यात जो गुरफटला गेला, त्याचे बाहेर पडणे कठीण आहे. राजकारणात असंख्य प्रतिस्पर्धी आणि पाय ओढणारे आहेत. समाजकारणात घरचं खावून, दुसर्यांच्या भाकर्या शेकाव्या लागतात. त्यामुळे या क्षेत्रात गर्दी आणि स्पर्धा नाही. काम करायला भरपूर वाव आहे. म्हणून ज्यांना निवडणुकीत उमेदवारी मिळाली नाही, परंतू सामाजिक कार्य करण्याची आंतरिक इच्छा आहे. त्यांनी हिंमत न हारता समाजकारणात यावे. कारण गुणवान व्यक्तीत मातीतून सोनं काढण्याची क्षमता असते.

हेमंत जकाते
अगरवेस, अकोला.

# कार्तिक आणि चैत्र महिन्यात हनुमान जयंती केली जाते साजरी!

*अकोला : हनुमानजी हे बलोपासनेचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे प्रत्येक गावात हनुमानाचे मंदिर हमखास पहावयास मिळते. प्रत्येक व्यक्ती हनुमानजींना आपले प्रेरणा व श्रद्धास्थान मानत असल्याने हा उत्सव सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात येतो. पौराणिक कथा व हिंदू पंचांगानुसार कार्तिक आणि चैत्र महिन्यात हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात येतो. हनुमान जयंती हा एकमेव उत्सव असा आहे की तो वर्षातून दोनदा साजरा करण्यात येतो. यामागचे कारण काय, असावे असा प्रश्न अनेक भाविक भक्तांना पडतो.*

अकोला : हनुमानजी हे बलोपासनेचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे प्रत्येक गावात हनुमानाचे मंदिर हमखास पहावयास मिळते. प्रत्येक व्यक्ती हनुमानजींना आपले प्रेरणा व श्रद्धास्थान मानत असल्याने हा उत्सव सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात येतो. पौराणिक कथा व हिंदू पंचांगानुसार कार्तिक आणि चैत्र महिन्यात हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात येतो. हनुमान जयंती हा एकमेव उत्सव असा आहे की तो वर्षातून दोनदा साजरा करण्यात येतो. यामागचे कारण काय, असावे असा प्रश्न अनेक भाविक भक्तांना पडतो.

कार्तिक महिन्याच्या कृष्ण पक्षातील चतुर्दशीला मंगळवारी हनुमानजींचा जन्म झाला असे पौराणिक कथेतून समजते. तो दिवस हनुमान जयंती म्हणून साजरा केला जातो. मात्र चैत्र महिन्याच्या पौर्णिमेला देखील हनुमान जयंती साजरी करतात. यामागे देखील एक पौराणिक कथा आहे. चैत्र महिन्यातील हनुमान जयंतीचे महत्व फार मोठे आहे. चैत्र महिन्यातील हनुमान जयंती व कार्तिक महिन्यात हनुमान जयंती का साजरी करतात पाहुयात काय सांगतात धार्मिक कथा.

चैत्र महिन्याच्या पौर्णिमेला हनुमानजींना नवीन जीवन प्राप्त झाले अशी पौराणिक कथा आहे. हनुमानजींकडे लहानपणापासूनच अलौकिक शक्ती होत्या. लहान असताना भूक लागली म्हणून त्यांनी तळपत्या सूर्यालाच फळ समजून गिळंकृत



केले होते.

त्यानंतर पृथ्वीवर अंधार पडला. हे इंद्र देवाला समजताच त्यांनी बाल हनुमानांवर आपल्या शास्त्राने वार केला. हनुमानजींचे पिता पवनदेवाला हे समजताच ते क्रोधित झाले आणि त्यांनी वायूप्रवाह थांबवला यामुळे पृथ्वीर अजारकता पसरली. हवेच्या अभावामुळे त्राही झाली. तेव्हा ब्रम्हदेवांना हस्तक्षेप करावा लागला. ब्रम्हदेवाने पवनदेवांना शांत केले व हनुमानजींना जीवित केले तो दिवस होता चैत्र महिन्यातील पौर्णिमेचा. यादिवशी हनुमानजींना पुनरुज्जीवन मिळाल्याने भक्त आपल्या आराध्याची जयंती या दिनी मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरी करतात.

कार्तिक महिन्याच्या कृष्ण पक्षातील चतुर्दशी तिथीला स्वाती नक्षत्रात मंगळवारी हनुमानजींचा जन्म झाला त्यामुळे हा दिवस हनुमान जयंती म्हणून सगळीकडे साजरा करण्यात येतो.

हनुमानजी रामभक्त आहेत हे आपण जाणतो. ते चिरंजीवी आहेत असे मानले जाते. त्यामुळे हनुमानजींना प्रसन्न करणे फार सोपे आहे. मात्र त्यासाठी पवित्र मनाने भक्ती करावी लागते. भक्तांना संकटातून वाचवण्याचे काम हनुमानजी करतात म्हणून तर त्यांना संकटमोचन असे म्हणतात. कार्तिक महिन्यात हनुमानजींचा जन्म झाल्याने ही जयंती महत्वाची मानली जाते.

तसेच श्री समर्थ रामदास स्वामींनी बलोपासनेचा संदेश देण्यासाठी हनुमानजींची मंदिरे गावोगावी स्थापन करण्यात आली. त्यामुळे अनेक गावांमध्ये हनुमानजी हे ग्रामस्थांचे आराध्य दैवत बनले आहे. त्यामुळे हनुमान जयंती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येतो. यानिमित्त ठिकठिकाणी महाप्रसादांचेही आयोजन करण्यात येते. रामनवमीनंतर लगेच हनुमान जयंती हा उत्सव येत असल्याने राम नामाचा गजर हा सप्ताहभर गावोगावी सुरू असतो.

सिटी न्यूज अकोला
गुरुवार, दि. २ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# सोसाट्याच्या वाऱ्यासह शहरात पाऊस

**अकोला:** अकोला शहरात सोमवारी रात्री अचानक हवामानात बदल झाला. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, सोसाट्याचा वारा आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला. यामुळे उकाड्याने हैराण झालेल्या अकोलेकरांना काहीसा दिलासा मिळाला असला, तरी अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले होते. अनेक भागांतील वीज पुरवठा खंडित झाला होता, तर ग्रामीण भागात वीज पडण्याच्या घटना समोर आल्या आहेत. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे शहराच्या काही भागांत झाडांच्या फांद्या तुटून पडल्या असून काही घरांवरील पत्रे उडाले आहेत. सोमवारी दिवसभर कडक ऊन आणि उकाडा जाणवत होता, मात्र सायंकाळी ६ वाजेनंतर आकाशात ढग जमा झाले. हवामान खात्याने इशारा दिल्यानंतर काही वेळातच शहरात वादळी पावसाला सुरुवात झाली. अचानक आलेल्या पावसामुळे तांत्रिक बिघाड होऊन अनेक भागांतील वीज पुरवठा विस्कळीत झाला.

## जिल्हाधिकाऱ्यांकडून बसस्थानकांवरील सुविधांची पाहणी



**अकोला:** जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी अकोला मध्यवर्ती बस स्थानकास भेट देऊन तेथील सुविधांची सविस्तर पाहणी केली.

या भेटीदरम्यान स्वच्छता, प्रवाशांच्या सोयीसुविधा, वाहतूक व्यवस्थापन तसेच सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक बाबींचा आढावा घेण्यात आला. संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सुधारणा तातडीने करण्याचे निर्देश देण्यात आले. प्रवाश्यांची गैरसोय होऊ नये यासाठी आवश्यक सुविधा सुरळीत ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले.

## 'स्वस्तिक पॅटर्न' वृक्षलागवड उपक्रम जिल्ह्यात सर्वदूर राबविणार

**अकोला:** वृक्षक्रांती मिशनतर्फे 'स्वस्तिक पॅटर्न'मध्ये संपूर्ण जिल्ह्यात वृक्षलागवडीचा प्रस्ताव असून, त्यांना सर्व यंत्रणांनी सहकार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी सर्व यंत्रणांना दिले आहेत.

मिशनचे संस्थापक ए. एस. नाथन यांच्यातर्फे 'स्वस्तिक पॅटर्न'मध्ये वृक्षलागवडीचा उपक्रम अनेक वर्षांपासून राज्यात ठिकठिकाणी राबविण्यात येत आहे. अकोला जिल्ह्यातील ६० शासकीय कार्यालये व जागांमध्ये या उपक्रमात वृक्षलागवड झाली. यंदाही हा उपक्रम राबविण्याची इच्छा असून, जिल्ह्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालये, ई-क्लास जमीनीवर, तसेच एमआयडीसीच्या खुल्या जागांवर स्वस्तिक वृक्षलागवडीसाठी नि:स्वार्थ सेवा देण्याची तयारी आहे, असे श्री. नाथन यांनी प्रस्तावात नमूद केले आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील वृक्षलागवडीला चालना मिळण्यासाठी कार्यालयातील जागा, पाण्याची व्यवस्था, रोपे, कुंपण, यंत्रसामग्री आदी बाबींसाठी यंत्रणांनी मिशनला सहकार्य करावे. वृक्षलागवडीसाठी मनरेगाअंतर्गत रोपवाटिकेतून विभागीय वनाधिकारी, सामाजिक वनीकरण विभागातर्फे विनामूल्य रोपे उपलब्ध करून द्यावी. जिल्ह्यात वृक्षलागवडीला चालना द्यावी, असे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले आहेत.



# हनुमान जयंतीनिमित्त वानर सेनेला मिष्टान्नाची दिली पंगत

प्रतिनिधी | २ एप्रिल

**अकोला:** बार्शिटाकळी तालुक्यातील कोथळी बुजरूक गावात हनुमान जयंतीनिमित्त जयंतीच्या तीन दिवसांत एक अनोखी पंगत पार पडते. ही पंगत देण्यात येते ती माकडांना.

कोथळी बु. या गावातील मुंगसाजी महाराज संस्थानच्या वतीनं माकडांना त्यांना आवडणाऱ्या मिष्टान्नाची पंगत देण्यात येते. विशेष म्हणजे माकडंही अगदी शिस्तीत पंगतीत बसत मिष्टान्नांवर ताव मारतात. घनदाट जंगलात असलेल्या मंदिरात गेल्या २० वर्षांपासून ही परंपरा सुरू आहे. या अनोख्या पंगतीचं हे दृश्य आपण पाहत आहोत.

सुरुवातीला संस्थांसमोर जेवणाचं ताट वाढण्यात आलं आहे .. पुढं निमंत्रणाचा मानापमान न ठेवता माकडे थेट झाडावरून खाली उतरले आणि येऊन रांगेत पंगतीत बसले. प्रत्येकी एक या प्रमाणे जेवणाचं ताट माकडांना वाढण्यात आलं होतं.. हनुमान जयंतीनिमित्त वानरसेनेचा हा अनोखा पाहुणचार पाहून आणि ही शिस्तीतील पंगत माणसांनाही लाजविणारी आहे. हनुमान जयंती निमित्त दर वर्षी कोथळी गावालगतच्या जंगलात असलेल्या या मंदिरात शेकडो भाविक मोठ्या संख्येने येतात, या ठिकाणी हनुमान जयंती च्या संपूर्ण सप्तहाःत विविध धार्मिक कार्यक्रम पार पडतात. खास हनुमान जयंती च्या दिवशी वानरसेनेला विशेष प्रसाद दिला जातो, या मंदिराची पुजारी हे स्वतः वानर सेनेला पंक्तीमध्ये येऊन जेवण करण्यासाठी आमंत्रित करतात. जंगलातील वानरसेना ही पुजाऱ्यांच्या आवाजावर मंदिराच्या समोर येऊन बसते व त्यावेळी मंदिराची पुजारी हे स्वतः वानर सेनेला ताट वाढून मिष्टान्न वितरित करतात, ही परंपरा पाहण्यासाठी हनुमान जयंतीला कोथळी बुद्रुकच्या या मंदिरात दरवर्षी दाखल होतात. गेल्या अनेक वर्षांपासून या मंदिराचे पुजारी तसेच भाविकांनी स्थानिक आमदार व सत्ताधारी याच्याकडे मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यांची दुरुस्ती तसेच मंदिरात लाईट बसविण्याची मागणी केली परंतु त्यांनी या कडे हेतुपुरस्पर पणे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला जात आहे.

# शासन निर्णय फक्त कागदावर, तालुक्यात कामबंद आंदोलनाचा भडका

प्रतिनिधी | २ एप्रिल

**अकोट:** अकोट तालुक्यात ग्राम रोजगार सहाय्यकांनी शासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त करत कामबंद आंदोलनाचा भडका उडवला आहे. शासनाने जाहीर केलेले निर्णय केवळ कागदावरच राहिले असून, प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप करत सहाय्यकांनी थेट शासनाला धारेवर धरले आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत गेल्या १८ वर्षांपासून ग्राम रोजगार सहाय्यक अत्यंत कमी मानधनावर गावपातळीवरील महत्त्वाची कामे पार पाडत आहेत. मात्र त्यांच्या हक्कांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

शासनाने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार दरमहा ८,००० रुपये मानधन, २,००० रुपये प्रोत्साहन भत्ता व डेटा पॅक देण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, या निर्णयाची अद्याप अंमलबजावणी न झाल्याने राज्यभरातील सुमारे २८,००० ग्राम रोजगार सहाय्यकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

> ग्राम रोजगार सहायकाच्या मागण्यांच्या अनुषंगाने निवेदन प्राप्त झाले आहे त्यांच्या मागण्या या वरिष्ठ स्तरावरील असल्याने निवेदन वरिष्ठ कार्यालय पाठवण्यात आलेले आहे,
>
> **रमाकांत माळी**
> गट विकास अधिकारी अकोट

याच संतापातून अकोट तालुक्यातील सहाय्यकांनी कामबंद आंदोलन पुकारले असून, त्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन गटविकास अधिकारी यांना सादर केले आहे.

> शासनाने घेतलेले निर्णय जर कागदावरच राहणार असतील, तर या निर्णयांना अर्थ काय? आमच्या संयमाचा अंत आता झाला आहे. हक्क मिळेपर्यंत लढा सुरूच राहील. शासनाने आता तात्काळ अंमलबजावणी करावी,
>
> **उमेश अवारे,**
> तालुका अध्यक्ष, अकोट

या आंदोलनामुळे ग्रामपंचायतींचे दैनंदिन कामकाज, रोजगार हमी योजनेची कामे तसेच ग्रामीण विकासाचे अनेक प्रकल्प ठप्प होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# हिवरखेडमध्ये हनुमान जयंतीनिमित्त महाप्रसाद वितरण

प्रतिनिधी | २ एप्रिल



**हिवरखेड:** चैत्र शुक्ल पक्ष पौर्णिमा २ एप्रिल या दिनी थाटात श्री हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला. या निमित्त गावातील स्थानिक हनुमान मंदिरान मध्ये पुरुष भक्तांची रेलचेल दिसून येत आहे, तर महिला भाविकांची चंडिका माता आई भवानी मंदिर धूप बंती आरती दर्शनाची गर्दी दिसून येत आहे, गावातील हनुमानजी मोठे मंदिर, पोलिस स्टेशन, संकट मोचन, मोराडी, पंचमुखी हनुमान, खारोन पुरा, मातंग पुरा, इंदिरा नगर, विविध ठिकाणी महाप्रसाद वितरीत करण्यात येत आहे, तसेच संध्याकाळी माता भगताच्या हातून गाढे ओढणे हा कार्यक्रम डफडे वाजत गाजत मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

# वडाळी देशमुख, अकोली जहागीर परिसरात चक्री वादळाने फळबागा उद्ध्वस्त

प्रतिनिधी | २ एप्रिल







**अकोट:** तालुक्यातील वडाळी देशमुख, सावरा, अकोली जहागीर, पणज, मंचनपूर परिसरातील बागायतदार संकटात सापडला आहे. सोमवारी रात्री झालेला मुसळधार पाऊस चक्रीवादळामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. वादळी वाऱ्यामुळे उभी पिके आडवी झाली असून काढणीला आलेला घास हिरावला गेल्याने बळीराजा हवालदिल झाला आहे. काही भागात मुळासहित झाडे पडल्याने रस्ता काही तास बंद पडला होता. चिक्कू, केळी, पपई, आंबा, लिंबू पिकांना वादळी वाऱ्याचा सर्वाधिक फटका बसला. वाऱ्याच्या वेगामुळे अनेक ठिकाणी केळीची झाडे उन्मळून पडली आहेत, तर पपईच्या बागांचेही मोठे नुकसान झाले आहे. आंबा गळून पडला आणि लिंबू फळांची गळती झाली. गहू, ज्वारी, बागायती ज्वारी काढणीला आलेला गहू आणि ज्वारीची पिके पावसामुळे जमीनदोस्त झाली आहेत. बागायती ज्वारीच्या पिकात पाणी साचल्याने दाण्यांची प्रत खालावण्याची भीती निर्माण झाली आहे. कांद्याची उभी पाती जमिनीला टेकली असून काही ठिकाणी कांदा सडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. टरबूज पिकाला गारपिटीचा मोठा फटका बसला असून फळांना तडे गेल्याने ती विक्रीयोग्य राहिलेली नाहीत.काही गावांमध्ये टीनपत्रे उडून गेली तर पुंडा येथे एक महिला जखमी झाली.

## ◆ निसर्गाच्या कोपामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले

> माझ्या शेतातील चिक्कूच्या बागेतील कच्च्या चिकू व परिपक्व झालेला १०० ते २०० ग्रॅमचा चिक्कू सह लिंबू बागेतील कच्चा व पक्का झालेला लिंबू गळून पडले. तात्काळ नुकसान भरपाई द्यावी.
>
> **निशिकांत गणगणे,**
> वडाळी देशमुख

> तीन वर्षे झाले माझ्या शेतातील टरबूज व खरबूज अवकाळी कधी व्हायरस अशा या निसर्गाच्या प्रकोपामुळे सडले. प्रशासनाने नुकसान भरपाई द्यावी.
>
> **गोपाल कात्रे,**
> रंभापुर

# न्यू इंग्लिश हायस्कूलमध्ये चित्रकला स्पर्धा




प्रतिनिधी | २ एप्रिल

**अकोला:** न्यू इंग्लिश हायस्कूल मध्ये रंगभरण व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला अकोला जिल्ह्यातील विविध शाळांमधून ६५० हून अधिक विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. संपूर्ण परिसर विद्यार्थ्यांच्या रंगांनी, कल्पनांनी आणि उत्साहाने भारावून गेला होता.

स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक व शैक्षणिक विषयांवर आकर्षक व कल्पक चित्रे सादर काढली. गट 'ब' (इयत्ता ६ ते ८) साठी विषय पंढरीची वारी, शाळा परिसर स्वच्छ करणारे विद्यार्थी, झाडे लावा, झाडे जगवा, माझा आवडता सण होते. उत्तम चित्रांची निवड केली.

ध्येय फाउंडेशन तर्फे शाळेला मिळालेल्या राज्यस्तरीय आदर्श शाळा पुरस्काराबाबत माहिती तुषार उज्जनकर यांनी दिली. स्पर्धेचे प्रास्ताविक शाळेचे प्राचार्य माधव मुनशी यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना अशा उपक्रमांमुळे त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे उद्घाटन अकोला एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष सहदेवराव रोठे यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून उपाध्यक्ष विजय नानोटी, उपमुख्याध्यापक उदय हातवळणे, पर्यवेक्षिका अलका बाजरे, पर्यवेक्षक हेमंत ओझरकर, ज्युनियर कॉलेज प्रभारी अमोल बुटे उपस्थित होते. स्पर्धाला शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष श्रीकृष्ण मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वैशाली धबाले यांनी केले. कलाशिक्षक आनंद वाघमारे व मनोज वाकोडे यांनी विद्यार्थ्यांना रंगभरण व चित्रकला स्पर्धेचे नियम समजावून सांगितले. शाळेचे शिक्षक मिलिंद घोगले यांना आचार्य पदवी प्राप्त झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

# घरगुती सिलेंडर वितरणावर प्रशासनाचे कडक नियंत्रण आवश्यक

प्रतिनिधी | २ एप्रिल

**अकोला :** मध्य पुर्वेत सुरू असलेल्या युद्धामुळे संपूर्ण जगातील तेल आणि गॅस चा पुरवठा प्रभावित झाला आहे. गॅस वितरकांच्या कार्यालया समोर सकाळ पासून ग्राहक रांगेत उभे असल्याचे दिसते. ग्राहकांनी नियमानुसार ऑनलाइन बुकिंग केल्यावर त्यांना कालक्रमानुसार घरपोच सेवा मिळणे आवश्यक आहे. एका ट्रक मध्ये साधारणपणे ३०० वर सिलेंडर असतात. काही वितरकांनी ग्राहकांना घरपोच सेवा देणे बंद केले आहे. ऑनलाइन बुकिंग केल्यावर ग्राहकांना वितरकांच्या कार्यालयात जाऊन रक्कमेचा भरणा करून पावती घ्यावी लागते. ट्रक जेंव्हा येईल त्यावेळेला पुन्हा रांगेत लागून सिलेंडर न्यावे लागते. ट्रक कधी येईल याची माहिती नसल्याने तसेच पावत्या जास्त फाडल्यामुळे ग्राहकांना सिलेंडर मिळेलच याची खात्री नाही. वितरक ग्राहकांकडून आगाऊ रक्कम घेऊन तीचा वापर करतात. हे योग्य नाही. काही वितरकांचे कार्यालय आणि गोदाम एका टोकाला असतात. ते ग्राहकांना सिलेंडर नेण्यासाठी शहराच्या दुसऱ्या टोकाला बोलावतात. याचा ग्राहकांना आर्थिक, मानसिक आणि शारीरिक त्रास होतो आहे. प्रशासनाने जाहीर केलेल्या एल पी जी हेल्पलाईन क्रमांकावर शासकीय सुट्टी च्या दिवशी फोन केला असता, मोबाईल बंद होता. प्रशासनाने हेल्पलाईन क्रमांक दररोज किती वाजता पासून किती वाजेपर्यंत सुरू राहील, तसेच सुट्टी च्या दिवशी सुरू राहील का? याचा जाहीर खुलासा करावा. युद्धामुळे गॅस च्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे हि, वस्तूस्थिती असली तरी रांगा बघून लोकांमध्ये विनाकारण घबराट निर्माण होवू नये म्हणून, प्रशासनाने गॅस वितरकांनी ट्रक आल्यानंतर ऑनलाइन बुकिंग केलेल्या ग्राहकांना कालक्रमानुसारच घरपोच सेवा द्यावी, असे सक्त निर्देश देण्याची व्यवस्था करावी. अशी मागणी सनातन संस्कृती महासंघातर्फे करण्यात आली असल्याचे प्रसिद्धी प्रमुख विजय केंदरकर यांनी कळविले आहे.

# जावेद हिदायत पटेल महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेसच्या महासचिव पदी

प्रतिनिधी | २ एप्रिल



**अकोट:** अकोट महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेसची कार्यकारिणी मुंबई येथील प्रदेश कार्यालयातून प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांच्या हस्ते जाहीर करण्यात आली.या नव्या कार्यकारिणीत महासचिव पदी जावेद हिदायत पटेल यांची निवड करण्यात आल्याने अकोट तालुक्यासह संपूर्ण अकोला जिल्ह्यात उत्साहाचे वातावरण आहे.महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेसच्या या विस्तृत कार्यकारिणीत १२४ पदाधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.या कार्यकारिणीत अकोल्यातील जावेद हिदायत पटेल यांना महत्वाच्या अशा महासचिव पदी जबाबदारी मिळाल्याने जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात समाधान व्यक्त होत आहे.जावेद हिदायत पटेल यांनी यापूर्वी युवक कॉंग्रेसच्या महत्वाच्या पदावर यशस्वी कामगिरी पार पाडली आहे.जावेद हिदायत पटेल हे अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातील मोहाळा येथील रहिवासी असून त्यांनी आपल्या स्वकर्तृत्वावर संघटनेत ठसा उमटविला आहे.नुकतीच जावेद हिदायत पटेल यांची अकोला वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदी अविरोध निवड झाली आहे. महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेसच्या महासचिव पदी नियुक्ती बद्दल बोलताना जावेद हिदायत पटेल म्हणाले की,पक्षश्रेष्ठींनी माझ्यावर जो विश्वास टाकला त्याला अधिक बळकटी देण्यासाठी प्रयत्नशील राहील.पटेल यांनी प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे,राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानु चिब,राष्ट्रीय सरचिटणीस तथा महाराष्ट्र प्रभारी अजय छिकारा,सह प्रभारी नवज्योत सिंग संधू तसेच अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण यांचे आभार मानले.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६

## मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय

गायत्री नगर. अकोला

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता १ ली ते १० वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार



मॉं गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. ९९२११८६७१५, ९५११२५४९५९, ९४२१८९५७९०, ९९६०४३७३६६

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. २ एप्रिल २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# कोट्यवधींची स्वीपर मशीन धुळ खात

## नगरपरिषदेला जाग आणण्यासाठी यज्ञ-पूजा

प्रतिनिधी २ एप्रिल

**यवतमाळ :** शहर स्वच्छतेसाठी कोट्यवधी रुपये खर्चून खरेदी करण्यात आलेली रोड व्हॅक्युम स्वीपर मशीन निष्क्रिय अवस्थेत पडून आहे. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने अनोख्या पद्धतीने आंदोलन करण्यात आले. प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात या मशीनसमोर प्रतीकात्मक यज्ञ-याग व पूजाअर्चा करून संताप व्यक्त करण्यात आला.

यवतमाळ नगरपरिषद प्रशासनाने शहरातील रस्ते स्वच्छतेसाठी हे आधुनिक वाहन खरेदी केले असले तरी प्रत्यक्षात त्याचा वापर होत नसल्याचा आरोप करण्यात आला. संबंधित प्रभागात स्वच्छतेसाठी वारंवार मागणी करूनही मशीन उपलब्ध करून दिले



जात नसल्याने कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली.

प्रशासन कुंभकर्णी झोपेत असल्यामुळे कोट्यवधींचे हे वाहन इतर निरुपयोगी वाहनांसह धूळ खात पडले असल्याची टीका यावेळी करण्यात आली. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी व हनुमान जयंतीच्या निमित्ताने 'देवाला साकडे' घालत या आंदोलनाचे आयोजन करण्यात आले.

या आंदोलनाचे नेतृत्व गटनेते तथा नगरसेवक डॉ. नीरज वाघमारे यांनी केले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोवंश वाहतूक : दोन वाहने जप्त, तिघांवर गुन्हा

प्रतिनिधी २ एप्रिल

**पांढरकवडा :** गोवंशीय जनावरांची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या दोन वाहनांवर पांढरकवडा पोलिसांनी १ एप्रिल २०२६ रोजी पहाटे मोठी कारवाई केली. यामध्ये सुमारे ८.९० लाखांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी तिघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

शुभम चंद्रशेखर किरपाल (वय २५), राहुल प्रल्हाद सोनुले (वय ३४) व धिरज गजानन मोहुर्ले (वय २३, व्यवसाय ट्रान्सपोर्ट) अशी आरोपींची नावे आहे. पोलीसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरून हिंगनघाटकडून आदिलाबादकडे जाणाऱ्या वाहनांवर लक्ष ठेवण्यात आले. वाय पॉईंट येथे नाकाबंदी करून टाटा एस (क्र. एमएच ३२ क्यू ४५८२) व बोलेरो पिकअप (क्र. एमएच ३३ टी २७७१) ही दोन संशयित वाहने अडवून तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान दोन्ही वाहनांमध्ये प्रत्येकी दोन गोवंशीय बैल जातीची जनावरे अत्यंत दाटीवाटीने, दोरखंडाने बांधून अमानुष पद्धतीने वाहतूक करताना आढळली. जनावरांसाठी बसण्याची, पिण्याच्या पाण्याची किंवा प्राथमिक उपचारांची कोणतीही सुविधा उपलब्ध नव्हती. तसेच वाहतुकीसाठी आवश्यक परवानाही नसल्याचे उघड झाले. चौकशीत वाहन चालकांनी ही जनावरे धिरज गजानन मोहुर्ले (रा. धोतरा, ता. वर्धा) यांच्या सांगण्यावरून आदिलाबाद येथे कत्तलीसाठी नेत असल्याची कबुली दिली. या प्रकरणी



आरोपी शुभम चंद्रशेखर किरपाल (वय २५), राहुल प्रल्हाद सोनुले (वय ३४) व धिरज गजानन मोहुर्ले (वय २३, व्यवसाय ट्रान्सपोर्ट) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ४९ तसेच प्राण्यांवर क्रूरतेस प्रतिबंध अधिनियम १९६० व महाराष्ट्र प्राणी संरक्षण (सुधारणा) अधिनियम १९९५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईत बोलेरो पिकअप (४ लाख), टाटा एस वाहन (३ लाख), दोन मोबाईल (३० हजार) व चार गोवंशीय जनावरे (१.६० लाख) असा एकूण ८.९० लाखांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबिन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक लहु तावरे यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर पेंढारकर व पोलीस कर्मचारी विकेश ध्यावर्तीवार यांनी यशस्वीपणे पार पाडली.

# गोवंश तस्करी : 9.35 लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी २ एप्रिल

**झरी :** गणेशपूर-खडकी मार्गावर पोलिसांनी केलेल्या कारवाईत गोवंशीय जनावरांची कत्तलीसाठी अमानुष पद्धतीने वाहतूक होत असल्याचे उघडकीस आले. या प्रकरणी एका आरोपीस ताब्यात घेऊन सुमारे ९ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गणेशपूर मार्गे खडकी फाटा येथून अडेगावकडे जाणाऱ्या छोटा हत्ती वाहन क्रमांक एमएच-२६ सीएच ०८५० मध्ये गोवंशीय जनावरे कोंबून नेली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिस पथकाने ३० मार्च रोजी सकाळी पंचांसह घटनास्थळी सापळा रचला. सकाळी सुमारे ८.४० वाजता खडकी फाटा येथे संबंधित वाहन अडवून तपासणी केली असता वाहनामध्ये ६ गोवंशीय जनावरे (बैल व गो-हे) अत्यंत दाटीवाटीने कोंबून ठेवलेली आढळली. जनावरांना आखूड दोऱ्यांनी बांधण्यात आले होते तसेच खाण्या-पिण्याची कोणतीही व्यवस्था नव्हती. अपुऱ्या जागेत अमानुष पद्धतीने वाहतूक केल्यामुळे जनावरांना तीव्र वेदना होत असल्याचे निदर्शनास आले.

वाहन चालकाने आपले नाव अजीत दत्ता आडे (वय २९, रा. चोरड, ता. माहूर, जि. नांदेड) असे सांगितले. पंचांसमक्ष करण्यात आलेल्या तपासणीत जप्त जनावरांची किंमत सुमारे १ लाख ३५ हजार रुपये तर वाहनाची किंमत अंदाजे ८ लाख रुपये असल्याचे निष्पन्न झाले. अशा प्रकारे एकूण ९ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त जनावरांची पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी करून त्यांना पुढील देखभालीसाठी श्री गुरु गणेश गोरक्षण चॅरिटेबल ट्रस्ट, रासा (ता. वणी, जि. यवतमाळ) येथे सुपूर्द करण्यात आले. या प्रकरणी आरोपीविरुद्ध प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० अंतर्गत कलम ११ (१) (घ), (ङ), (झ) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# मोलमजुरी करणाऱ्या कुटुंबातील मुलगा पोलीस दलात

प्रतिनिधी २ एप्रिल

**यवतमाळ :** आसेगाव देवी येथील होतकरू युवक विक्की सुरेश वाघाडे यांची यवतमाळ पोलिस दलात निवड झाल्याने गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अत्यंत प्रतिकूल आणि गरिबीच्या परिस्थितीतून जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले.

विक्की यांचे आई-वडील मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. अशा परिस्थितीतही त्यांनी शिक्षणासोबत पोलिस भरतीची तयारी सुरू ठेवत सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या या चिकाटीमुळे त्यांची SBC प्रवर्गातून एकमेव निवड झाली असून



त्यांनी गावासह परिसराचा सन्मान वाढवला आहे.

त्यांच्या यशामुळे आसेगाव देवी गावात सर्वत्र आनंद व्यक्त केला जात असून ते इतर युवकांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत. दरम्यान, माजी सरपंच सचिन चव्हाण व ग्रामस्थांच्या वतीने विक्की सुरेश वाघाडे यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# विजेच्या लपंडावाने नागरिक संतप्त, महावितरण कार्यालयावर धडक

प्रतिनिधी २ एप्रिल

**उमरखेड :** शहरातील सतत खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांचा संयम सुटला. त्यामुळे रात्री संतप्त नागरिकांनी महावितरण कार्यालयावर धडक दिली. विशेष म्हणजे, या वेळी कार्यालयात एकही अधिकारी किंवा कर्मचारी उपस्थित नसल्याने नागरिकांचा रोष अधिकच वाढला.

गेल्या आठ-दहा दिवसांपासून शहरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असून दिवसभरात तब्बल २० ते २५ वेळा वीज जाते, अशी तक्रार



नागरिकांनी केली. वाढता वीजभार, अपुरी रोहित्र व्यवस्था, जिर्ण झालेले विद्युत तारा, तसेच झाडांच्या फांद्यांमुळे होणारे अडथळे या समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

तक्रार नोंदविण्यासाठी दिलेले संपर्क क्रमांक सतत व्यस्त किंवा बंद असल्याने नागरिकांची गैरसोय अधिकच वाढत आहे. दरम्यान, वसुलीच्या कामावर अधिक भर देत असताना देखभालीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही नागरिकांनी केला.

रात्री काही काळ वीजपुरवठा सुरळीत झाल्यानंतर नागरिक घरी परतले; मात्र रात्री उशिरा पुन्हा वीज खंडित झाल्याने नागरिकांनी मध्यरात्री पुन्हा एकदा महावितरण कार्यालय गाठले. मात्र, यावेळीही एकही जबाबदार अधिकारी उपस्थित नव्हता.

एकाच दिवशी दोनदा नागरिकांनी धडक देऊनही त्यांच्या समस्या ऐकून घेण्यासाठी कोणीही पुढे न आल्याने महावितरणच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.




**यवतमाळ :** हनुमान जयंती निमित्त यवतमाळ येथील श्री गजानन महाराज मंदिरात साकारलेली सुंदर रांगोळी भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे. सकाळच्या प्रसन्न वातावरणात भक्ती, श्रद्धा आणि कलेचा संगम अनुभवायला मिळतो. या आकर्षक रांगोळीने उत्सवाची शोभा अधिकच वाढवली आहे.

# पोहरादेवी–माहूर गड विकासासाठी केंद्राकडे पाठपुरावा

प्रतिनिधी २ एप्रिल

**यवतमाळ :** मतदारसंघातील विविध विकासकामांसंदर्भात खासदार संजय देशमुख यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन महत्त्वाच्या मागण्या मांडल्या. टोलबंदी, रस्ते सुधारणा आणि धार्मिक स्थळांच्या विकासाचा मुद्दा या भेटीत प्राधान्याने उपस्थित करण्यात आला.

राष्ट्रीय महामार्ग 361C वरील दारव्हा तालुक्यातील भांडेगाव येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या टोल नाक्याबाबत त्यांनी तीव्र आक्षेप नोंदवला. याच मार्गावर अल्प अंतरावर खेरडा बुद्रुक येथे आधीच टोल नाका अस्तित्वात असताना नवीन टोल सुरू करणे नियमबाह्य असल्याचे त्यांनी सांगितले. दुहेरी टोलवसुलीमुळे



स्थानिक नागरिक, शेतकरी व व्यापाऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याने संबंधित टोल नाका तत्काळ बंद करण्याची मागणी त्यांनी केली.

यासोबतच वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी आणि नांदेड जिल्ह्यातील माहूर गड या महत्त्वाच्या धार्मिक स्थळांच्या विकासाचा मुद्दाही त्यांनी मांडला. या तीर्थक्षेत्रांचा केंद्र सरकारच्या 'प्रसाद' योजनेत समावेश करण्यात यावा, यासाठी केंद्रीय पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांच्याकडे शिफारस करण्याची विनंती करण्यात आली.

तसेच पोहरादेवीकडे जाणाऱ्या सिंगद–पोहरादेवी व पंचाला–पोहरादेवी मार्गांची दयनीय अवस्था लक्षात घेता, या रस्त्यांचे रुंदीकरण व मजबुतीकरण करण्याची मागणीही त्यांनी केली. वाढत्या भाविक संख्येच्या पार्श्वभूमीवर सुरक्षित व सुलभ प्रवासासाठी ही कामे तातडीने करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

खासदार देशमुख यांच्या या मागण्यांमुळे विदर्भातील धार्मिक पर्यटनाला चालना मिळून स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# हनुमान चालीसामध्ये जीवनाचा संपूर्ण मार्ग दडलेला : क्षितिजी महाराज

प्रतिनिधी २ एप्रिल

**यवतमाळ :** हनुमान आखाडा चौक येथील श्री हनुमान मंदिर समितीच्या वतीने आयोजित पंचदिवसीय हनुमान जन्म कल्याणक महोत्सवांतर्गत श्री हनुमान कथाचे भव्य आयोजन करण्यात आले. यावेळी क्षितिजी महाराज यांनी हनुमान चालीसाच्या महत्त्वावर प्रभावी मार्गदर्शन केले.

ते म्हणाले की, श्रद्धा आणि विश्वासाने हनुमान चालीसाचे पठण करणाऱ्या व्यक्तीच्या जीवनात सुख, शांती आणि धर्म, अर्थ, काम, मोक्ष असे चारही पुरुषार्थ प्राप्त होतात. हनुमान चालीसा ही आकाराने छोटी असली तरी ती एक मोठा ग्रंथ असून मानवाला योग्य जीवनमार्ग दाखवणारी आहे. हनुमान चालीसातील ४० चौपाया या गुरुच्या ४० लक्षणांचे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले. हनुमानजींचे चरित्र हे आदर्श भक्त, सेतू (संयोजक) आणि गुरु म्हणून प्रेरणादायी असून जीवनाला दिशा देणारे आहे. जीवन कथेशी आणि भक्तीशी जोडण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमादरम्यान यवतमाळ नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष सुभाष राय यांचा शाल, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना सुभाष राय म्हणाले की, "मी गेल्या ७० वर्षांपासून या मंदिराच्या हनुमान जयंती उत्सवाशी जोडलेलो आहे. हनुमान आखाडा चौक येथील हे मंदिर ब्रिटिशकालीन नसून अतिशय प्राचीन काळातील आहे."

**महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग तहसिलदार महागांव यांचे कार्यालय, महागांव**
Email id- tgp.mahagoan@gmail.com
दुरध्वनी क्रमांक 07236-222238
क्रमांक/म.स./जन्म नोद/कावि/166/2026
दिनांक 17/12/2025

**जाहीरनामा**

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते, अर्जदार - शेख गफार शेख फरीद रा. गुंज, ता. महागांव जि. यवतमाळ यांनी त्यांचे मुली करीता कु. फरजाना शेख गफार जन्म/सचिव ग्रा.पंचायत गुंज ता. महागांव येथे दि. 07/05/1986 रोजी झाला आहे, परंतु त्यांच्या जन्माची नोंद. सचिव. ग्रा.पंचायत गुंज/ नगरपंचायत, महागांव येथे नसल्यामुळे महाराष्ट्र जन्म नोंदणी अधिनियम कलम 13 (3) नगरपंचायत, महागांव यांना जन्म नोंद घेण्याबाबत प्रकरण या कार्यालयास सादर केले आहे.

तरी हितसंबंधित व्यक्तीचे उपरोक्त जाहीरनामाबाबत कोणाचा काही आक्षेप असेल तर त्यांनी आपले आक्षेप लेखी स्वरुपात दिनांक 06/04/2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात 15 दिवसाच्या आत सादर करावेत. मुदती नंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

शिक्का

**स्वा./-**
**तहसिलदार, महागांव**

**महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग तहसिलदार महागांव यांचे कार्यालय, महागांव**
Email id- tgp.mahagoan@gmail.com
दुरध्वनी क्रमांक 07236-222238
क्रमांक/म.स./जन्म नोद/कावि/166/2026
दिनांक 13/11/2025

**जाहीरनामा**

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते, अर्जदार - शेख गफार शेख फरीद रा. गुंज, ता. महागांव जि. यवतमाळ यांनी त्यांचे मुली करीता कु. शबाना शेख गफार जन्म/सचिव ग्रा.पचायत गुंज ता. महागांव येथे दि. 01/01/1984 रोजी झाला आहे, परंतु त्यांच्या जन्माची नोंद. सचिव. ग्रा.पंचायत गुंज/ नगरपंचायत, महागांव येथे नसल्यामुळे महाराष्ट्र जन्म नोंदणी अधिनियम कलम 13 (3) नगरपंचायत, महागांव यांना जन्म नोंद घेण्याबाबत प्रकरण या कार्यालयास सादर केले आहे.

तरी हितसंबंधित व्यक्तीचे उपरोक्त जाहीरनामाबाबत कोणाचा काही आक्षेप असेल तर त्यांनी आपले आक्षेप लेखी स्वरुपात दिनांक 06/04/2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात 15 दिवसाच्या आत सादर करावेत. मुदती नंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

शिक्का

**स्वा./-**
**तहसिलदार, महागांव**

# 'समता पर्वा'त वैचारिक-सांस्कृतिक मेजवानी

प्रतिनिधी २ एप्रिल

**यवतमाळ :** सामाजिक परिवर्तनाचे अग्रदूत महात्मा ज्योतिबा फुले आणि राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त गेल्या २२ वर्षांपासून आयोजित करण्यात येणाऱ्या 'समता पर्वा'त यंदाही वैचारिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांची भरगच्च मेजवानी अनुभवायला मिळणार आहे. समतापर्व प्रतिष्ठानच्या वतीने यवतमाळच्या समता मैदानावर ७ ते १३ एप्रिल दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



मंगळवार (७ एप्रिल) रोजी सकाळी ११ वाजता विविध स्पर्धा, समूह नृत्य आणि प्रसिद्ध संगीतकार डॉ. मधुकर मेश्राम यांच्या सुगम संगीत कार्यक्रमाने पर्वाची सुरुवात होणार आहे. बुधवारी (८ एप्रिल) समता पर्व महिला समितीच्या वतीने 'वूमन आयकॉन' उपक्रम, महिलांचे सांस्कृतिक कार्यक्रम आणि सायंकाळी कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे. गुरुवारी (९ एप्रिल) दुपारी ४ वाजता अनिल रामजी आडे यांच्या हस्ते 'यवतमाळ आयडॉल'चे उद्घाटन होणार असून, यावेळी पत्रकार अभिजीत कांबळे (संपादक, बीबीसी मुंबई) यांचे 'भारतीय राजकारणाचे पतन व माध्यमांची जबाबदारी' या विषयावर प्रबोधनपर व्याख्यान होईल. पुढील दिवशी (१० एप्रिल) सायंकाळी ६ वाजता विचारवेध सत्र व उद्घाटन सोहळा होणार असून, प्रमुख अतिथी म्हणून डॉ. हर्षदीप कांबळे (प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग) उपस्थित राहणार आहेत. यावेळी प्रदीप झाडे, नारायण फुल, शंकरराव नारनवरे, नरेंद्र फुलझेले, डॉ. विशाल जाधव, मंगला मून, ओमप्रकाश नगराळे, संघपाल मेश्राम, धीरज थूल आदींची उपस्थिती राहणार आहे.

शनिवारी (११ एप्रिल) सकाळी ११ वाजता महात्मा फुले यांच्या पुतळ्यास अभिवादन रॅली काढण्यात येईल. सायंकाळी 'यवतमाळ आयडॉल'ची दुसरी फेरी व रात्री विचारवेध सत्राचे उद्घाटन हरियाणाचे माजी मंत्री राजकुमार सैनी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी 'समतारत्न पुरस्कार' प्रदान केला जाणार असून, डॉ. अब्दुल रहमान (पोलीस महानिरीक्षक) प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

रविवारी (१२ एप्रिल) 'माझे गीत, माझे संगीत' कराओके स्पर्धा, यशस्वी योगा ग्रुपचे लेझीम प्रात्यक्षिक आणि 'एक क्षण गौरवाचा' या कार्यक्रमांतर्गत राधिका वेमुला, नीताताई होले, शुभांगी ताई धुतरे आणि डॉ. लीला भेले यांच्या उपस्थितीत आत्मचरित्र प्रकाशन व गौरव सोहळा पार पडणार आहे.

सोमवारी (१३ एप्रिल) समारोप सोहळ्यात 'यवतमाळ आयडॉल'ची अंतिम फेरी होणार असून, ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत ज. वी. पवार यांचे 'बहुजन समाजाचे एकत्रीकरण आणि आंबेडकरी चळवळीची भूमिका' या विषयावर जाहीर व्याख्यान होईल. यावेळी विविध स्पर्धांतील विजेत्यांना पुरस्कार वितरणही करण्यात येणार आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री, लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

समता पर्वाच्या आयोजनात नारायण थूल (अध्यक्ष), डॉ. विलास कन्नाके (सचिव), राजू चांदेकर, उमेश मेश्राम, माधुरी अनिल आडे, प्रमोदिनी रामटेके, डॉ. चंद्रकांत सरदार, राहुल कोचे, चंद्रकांत वाळके, ॲड. ज्योती जीवने, हर्षाली बोडके, काजल तायडे, धर्मपाल भितकर, शुभम वाळके, डॉ. शैलेंद्र तेलंग, डॉ. बाळकृष्ण सरकटे, सुरज खोब्रागडे, रमेश अतकर, नंदकिशोर निमगडे, डॉ. दिलीप घावडे, जनार्दन मनवर, रीना वानखडे, माधुरी वाळके, वृंदा कांबळे आदींचा सक्रिय सहभाग आहे.

सिटी न्यूज अमरावती

गुरुवार, दि. २ एप्रिल २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# जिल्हास्तर युवा पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**अमरावती:** महाराष्ट्र राज्य युवा धोरणानुसार सन २०२५-२६ या वर्षाकरिता जिल्हास्तर युवा पुरस्कारासाठी पात्र युवक-युवती व संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. समाजाच्या सर्वांगीण विकास प्रक्रियेत युवकांचा सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने हे पुरस्कार दिले जाणार असून, इच्छुक उमेदवारांनी ८ एप्रिल २०२६ पर्यंत आपले प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी केले आहे. या पुरस्काराचे स्वरूप युवक व युवतींसाठी प्रत्येकी १० हजार रुपये रोख, गौरव पत्र आणि सन्मानचिन्ह, तर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या एका नोंदणीकृत संस्थेसाठी ५० हजार रुपये रोख, गौरव पत्र आणि सन्मानचिन्ह असे आहे. पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या युवक-युवतींचे वय १ एप्रिल रोजी १५ वर्षे पूर्ण तसेच ३१ मार्च रोजी २९ वर्ष पर्यंत असावे. जिल्ह्यात सलग पाच वर्षांचे वास्तव्य असणे अनिवार्य आहे.

# राम मेघे अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालया 'च्या विद्यार्थ्यांनी 'डिपेक्स २०२६' या राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धेत मिळवले देदीप्यमान यश

प्रतिनिधी २ एप्रिल




**अमरावती :** व्ही व्हाय डब्लू एस च्या प्रो. राम मेघे अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालया'च्या, बडनेरा येथील विद्यार्थ्यांनी, ५ मार्च २०२६ ते ८ मार्च २०२६ या कालावधीत छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथील एम आय टी कॅम्पसमध्ये आयोजित 'डिपेक्स २०२६' या राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून पुन्हा एकदा आपल्या शैक्षणिक कौशल्याची चुणूक दाखवून दिली आहे. जि पी एस आणि जी एस एम तंत्रज्ञानावर आधारित महिला सुरक्षा उपकरण' (वूमेन सेफ्टी डिव्हाईस बेस्ड ऑन जिपीएस आणि जीएसएम तंत्रज्ञान) असे शीर्षक असलेल्या या प्रकल्पाचे नेतृत्व तृतीय वर्ष विद्यार्थी आवेझ खा यांनी केले; त्यांना विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या द्वितीय वर्षातील श्री. अभय दुर्गे आणि कार्तिक पुरम यांनी सहकार्य केले. या प्रकल्प संघाला प्रा. वाय. पी. खडसे यांचे मार्गदर्शन लाभले.

या असाधारण यशाबद्दल, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद ए. बारहाते यांनी या प्रकल्प संघातील विद्यार्थ्यांचा सत्कार केला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय पी. ठाकरे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, ठआमच्या विद्यार्थ्यांचे समर्पण आणि कठोर परिश्रम पाहून आम्हाला अत्यंत अभिमान वाटतो. हे यश आमच्या प्रतिष्ठित संस्थेतील गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सर्वांगीण विकासाप्रती असलेल्या आमच्या प्राध्यापक वर्गाच्या कटिबद्धतेचे प्रतिबिंब आहे. विद्युत अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. अमित व्ही. मोहोड यांनी यात भर घालताना म्हटले, 'व्यावहारिक शिक्षणावर आणि मूलभूत संकल्पनांच्या भक्कम पायावर आम्ही दिलेल्या भरचे हे स्पष्ट फलित आहे. विजेत्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन! तसेच, व्ही व्हाय डब्लू एस चे अध्यक्ष माननीय डॉ. नितीनजी धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष माननीय प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव माननीय युवराजसिंहजी चौधरी आणि कार्यकारिणी सदस्य नितीन हिवसे, डॉ. (श्रीमती) पूनमताई चौधरी, पंकज देशमुख, प्रा. विनयजी गोहाड व प्रा. गजानन काळे यांनीही या गुणवंत विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय यशाचे कौतुक केले.

# रात्री दरम्यान दरोडा घालण्याच्या तयारीत असलेल्या गुन्हेगारांवर कारवाई

प्रतिनिधी २ एप्रिल

## गाडगे नगर पोलिसांनी घेतल्या आरोपीला ताब्यात



**अमरावती :** गाडगेनगर येथील डि.बी. पथकाने रात्रीदरम्यान दरोडा घालण्याचे तयारीत असलेले गुन्हेगारांवर अप.नं. ३३९/२६ कलम ३१०(४), ३१०(५) भा.न्या.सं. (३९९, ४०२ भा.दं.वि.) अन्वये कार्यवाही करण्यात आली. दि. ३१/०३/२०२६ रोजीचे ९ वाजता वा ते दि. ०१/०४/२०२६ चे ९ वा. पावेतो पो.स्टे. गाडगेनगर येथील डि.बी. पथक पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे निर्देशांप्रमाणे व.पो.नि. पो.स्टे. गाडगेनगर यांचे आदेशान्वये गुन्हे प्रतिबंध पेट्रोलिंग करीत असतांना ०१/०४/२०२६ रोजीचे ०१.५० वा. पो.हवा. भारत वानखडे यांना गोपनिय माहीती मिळाली की, काही इसम हे रात्रीचे अंधारात हातात घातक हत्यारे घेवुन मणिपुर ले-आऊट परिसरातील इ गुडुपांमागे लुटपाट करणे व जिवे मारण्याचे तयारीने बसलेले आहेत.

अश्या माहीतीवरुन पो. स्टाफने मणिपुर लेआऊट मधिल फ्लॅटच्या मागिल बाजुचे परिसरातील अंधार परिसरात मध्यरात्रीचे २.१० वा. दरम्यान जावुन पाहिले असता काही इसम संशयीत रित्या रात्रीच्या अँधारात बिल्डींगच्या मागे तोंडावर दुपट्टा व रुमाल बांधुन दबा धरुन गंभीर स्वरुपाचा गुन्हा करण्याचे इरादयाने बसलेले दिसुन आले. वरुन त्यांना पो. स्टाफच्या मदतीने जागीच पंचासमक्ष ताब्यात घेतले व त्यांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव आदित्य उर्फ मारी प्रमोद भडके, वय २३ वर्ष, रा. जयसियाराम नगर, अमरावती, सोमेश उर्फ सोम्या विश्वास सोळंके, वय ३० वर्ष, रा. महेंद्र कॉलणी, अमरावती, गौरव गणेशराव वेलकर, वय २५ वर्ष, रा. लक्ष्मीनगर, अमरावती, निखिल उर्फ निक्कु राजु गायकवाड, वय २४ वर्ष, रा. शोभा नगर, अमरावती व अभिजित महादेवराव चौधरी, वय २८ वर्ष, रा. शोभा नगर, अमरावती असे दिसुन आले, त्यांचेकडुन घटनास्थळ जप्ती पंचनामा प्रमाणे एक लोखंडी रॉड, एक चायना चाकु, एक लोखंडी कोयता, एक लोखंडी फरसा, दोरी, मिरची पुड व एक मोबाईल, दोन मोटर सायकल असा एकुण १,६१,२१०/- रु. चा मुद्देमाल आरोपीतांकडुन मिळुन आला. त्यांना ताब्यात घेवुन त्यांचेवर पो.स्टे. ला अप.नं. ३३९/२६ कलम ३१०(४), ३१० (५) भा.न्या.सं. अन्वये कार्यवाही करण्यात आली आहे. ही कार्यवाही पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे साहेब, सहा. पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, गाडगेनगर विभाग, अमरावती शहर यांचे सुचनांनुसार वरीष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, पो.नि. क्राईम विजया पंधरे, पो.नि. प्रशासन समाधान वाठोरे यांचे मार्गदर्शनात पोउपनि प्रणित पाटील, डि.बी. इंचार्ज पोहवा. भारत वानखडे, पो.ना. राजेश गुरेले, पो.शि. सुशांत प्रधान, पो.शि. मतिन शेख, पो.शि. रुपेश हटकर, पो.शि. पवन काळे, पो.शि. अशिष पडोळे, पो.शि. हितेश वाठोडकर पो.स्टे. गाडगेनगर यांनी केली.

# महिला अत्याचार प्रकरणी आरोपीवर कठोर कारवाई करा

प्रतिनिधी २ एप्रिल

## भाजपच्या पदाधिकाऱ्यांचे पोलिस आयुक्तांना निवेदन



**अमरावती :** भानखेडा मार्गावर एका महिलेवर झालेल्या अत्याचार प्रकरणी आरोपीवर कठोर शिक्षा करून अशा अज्ञात ठिकाणी ठिकाणी पोलिसांनी पेट्रोलिंग वाढवावी तसेच कारवाई करावि या मागणीसाठी भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस आयुक्त कार्यालयात पोलीस आयुक्त राकेश ओला यांना निवेदन सादर केले. यावेळी डीसीपी गणेश शिंदे यांची उपस्थिती होती. त्यांच्याशी भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी सखोल चर्चा केली.

हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालून आरोपीला कठोर शिक्षा द्यावी अशी मागणी यावेळी निवेदन देताना भाजपाचे शहराध्यक्ष नितीन धांडे, माजी शहराध्यक्ष किरण पातुरकर, ज्येष्ठ नगरसेविका सुरेखा लुंगारे, नगरसेविका राधा कुरील, नगरसेविका पंचफुला, चव्हाण, नगरसेविका कल्याणी तायडे, सुनील समंदुरकर, नगरसेवक मिलिंद बांबल, श्रीकांत धानोरकर, जयेंद्र आरोरकर, प्रफुल बोके, गजानन चिंचोळकर, विकी शर्मा, अमित कुलवंत यासह भाजपच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# अमरावतीत भव्य शिक्षक मेळावा; शिक्षण क्षेत्रातील दिग्गजांची उपस्थिती ठरणार आकर्षण

प्रतिनिधी २ एप्रिल



**अमरावती :** शहरात येत्या ३ एप्रिल रोजी भव्य विभागीय शिक्षक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या मेळाव्याची तयारी सध्या जोरात सुरू आहे. भाजप शिक्षक आघाडी आणि शिक्षण संघर्ष संघटनेच्या संयुक्त विद्यमाने हा महत्त्वपूर्ण मेळावा आयोजित करण्यात येत आहे. शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी हा मेळावा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या मेळाव्याचे अध्यक्षस्थानी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे राहणार आहेत तर प्रमुख अतिथी म्हणून भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी लेडी गव्हर्नर कमलताई गवई, शिक्षण मंत्री पंकज भोयर, भाजपाचे विदर्भ संघटन मंत्री उपेंद्र कोठे कर, राज्यसभा खासदार अनिल बोंडे, महापौर श्रीचंद तेजवानी, आमदार रवी राणा, आमदार प्रताप अडसड, आमदार केवलराम काळे, आमदार प्रवीण तायडे, आमदार राजेश वानखडे, आमदार उमेश यावलकर, माजी खासदार नवनीत राणा, माजी मंत्री प्रवीण पोटे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, शहराध्यक्ष नितीन धांडे, श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी अध्यक्ष हेमंत काळमेघ, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या सचिव माधुरी चेंडके यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते व सत्कारमूर्ती म्हणून राष्ट्रपती पुरस्कार विजेते मुख्याध्यापक दत्तात्रयजी वारे गुरुजी, अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रमाचे सरचिटणीस पद्मश्री जनार्दन पंत बोथे गुरुजी, कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांचाही सत्कार करण्यात येणार आहे.

# बघीया हॉटेल जवळ आग

प्रतिनिधी २ एप्रिल



**अमरावती :** बघीया हॉटेल जवळ आग लागल्याची घटना एक एप्रिल रोजी सायंकाळी साडेपाच वाजता दरम्यान घडली. अग्निशामक दलाच्या बंबने तिथे पोहोचून आगीवर नियंत्रण मिळवले. यात परिसरातील झाडे जळून खाक झाली आहे.

बघीया हॉटेल जवळ एमआयडीसी रोड बडनेरा अमरावती आग लागली होती. या संदर्भाची माहिती बडनेरा दक्षिण झोन क्रमांक ४ येथील सहाय्यक आयुक्त शिंदे यांनाफोन द्वारे माहिती दिली की बगीया हॉटेल जवळजवळ आग लागली आहे तरी फायर लॉरी घेऊन वाहन चालक नरेश राऊत फायरमॅन सुशांत तायडे प्रज्वल हेंगड घटना स्थळी रवाना व सदर घटनास्थळी आग पाहता होज रील होज व डिलिव्हरी होज च्या साह्याने पाणी मारण्यास सुरुवात केली साधारणत १ ते २ तासा पर्यंत दोन फायर टेंडर पाणी मारून संपूर्ण आग विझवण्यात आली .

# 'प्रा. शुभांगी क्षितिज अभ्यंकर' यांना डॉक्टरेट पदवी

प्रतिनिधी २ एप्रिल

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मार्फत सन्मानित करण्यात येणार



**अमरावती:** प्रा. शुभांगी क्षितिज अभ्यंकर 'यांच्या शिरपेचात मानाचा प्रथम तुरा रोवला गेला आहे. अमरावती येथील संत गाडगेबाबा विद्यापीठाकडून त्यांना 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (Ph.D) (समाजशास्त्र) या पदवीने सन्मानित करण्यात येणार आहे.पश्चिम विदर्भातील उच्चमाध्यमिक विद्यार्थिनींच्या सामाजिक आर्थिक परिस्थितीचा - त्यांच्या शालेय प्रदर्शनावर होणारा परिणाम एक समाजशास्त्रीय विश्लेषण हा त्यांचा प्रबंध होता. डॉ.मंगला डी .तांबेकर याचे मार्गदर्शन लाभले. आता शुभांगीताई क्षितिज अभ्यंकर यांच्या नावामागे आता 'डॉक्टर' ही पदवी अधिकृतपणे जोडली जाणार आहे . सध्या शुभांगीताई क्षितिज अभ्यंकर ह्या राहुल व्यायाम प्रसारक मंडळ अमरावतीच्या संचलिका आहेत. त्यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी बोलताना म्हटले की ,अमरावती येथील संत गाडगेबाबा विद्यापीठाकडून 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (Ph.D) पदवी ही मी सदैव पितृतुल्य असणारे माझे सासरे, नेहमी माझ्या पाठीशी उभे राहणारे व मला वेळोवेळी मार्गदर्शन करणारे तसेच योग्य दिशा दाखवणारे समाजभूषण मधुकरराव अभ्यंकर यांना समर्पित करीत आहे. तसेच कुटुंबाचा सांभाळ करत असताना नेहमी साथ देणारे ,प्रेरणादायी व्यक्तिमत्व माझे पती क्षितिज अभ्यंकर यांचे मला खूप मोठे योगदान लाभले असे मत व्यक्त केले. त्यांच्या यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष मधुकरराव अभ्यंकर, कांताताई अभ्यंकर, प्राचार्य डॉ. राजेश चंदनपाठ, राजेंद्र ढेपे, पद्माताई ढेपे, दिलीप तांबेकर,, डॉ. मंगला तांबेकर, क्षितिज अभ्यंकर, ॲड. शुभांगीताई थेटे, सुषमाताई कोंडे, प्राचार्य गजानन वानखडे, मंगलाताई वंजारी, सीमाताई ठाकरे, प्रशांत ढेपे, धनश्री ढेपे, प्रा.सुधाकर गावंडे, सतीश पुंडकर, अरुण वानखडे, दिनेश मोहोड, अविनाश पवार, उद्धव कोकाटे, दीपक कळसकर, दिनेश थोरात, केतन खिरकर, अमित वानखडे, गोपाल अभ्यंकर, सागरसिंग चव्हाण, मुकुंद चौधरी, प्रमोद अभ्यंकर, रमेश कौतिककर, अनंता मोहोळ , गौरखनाथ पर्वतकर, जीवन फसाटे, विकास फसाटे,आकाश वंजारी समर्थ अभ्यंकर, विहान अभ्यंकर यांनी शुभेच्छा दिल्या.

# सातूर्णा येथे कुंटणखाण्यावर पोलिसांची धाड



प्रतिनिधी २ एप्रिल

## शहर गुन्हे शाखेची कारवाई

**अमरावती:** राजापेठ पोलीस स्टेशन हद्दीतील सातुर्णा एमआयडीसी, शिलांगण रोड येथील भव्यदिप अपार्टमेंट येथे फ्लॅट मध्ये चालणाऱ्या कुंटनखाण्यावर पोलीस आयुक्त राकेश ओला, डीसीपी गणेश शिंदे, एसीपी शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, गुन्हे शाखा यांचे नेतृत्वात अमरावती शहर गुन्हे शाखेची धाड टाकून कुंटणखाना महिलेसह चालवीणाऱ्या महिलेसह पाच जणांना ताब्यात घेण्यात आली आहे. या कारवाईमुळे अमरावती सुरू असलेल्या कुंटणखाना चालवणाऱ्यांचे धाबे दानाणले आहे.

# अमरावती वाहतूक पोलीस ॲक्शन मोडवर

प्रतिनिधी २ एप्रिल

## ट्राफिक सिग्नल ची केली पाहणी, अपघात टाळण्यासाठी प्रयत्न

**अमरावती :** पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त धुमाळ यांच्या आदेशाने वाहतूक पोलिसांनी पंचवटी चौक, इर्विन चौक व इतर ठिकाणच्या ट्राफिक सिग्नल ची पाहणी केली असून वाहतूक पोलिसाचा ॲक्शन मोडून आली आहे. शहरात किरकोळ अपघात वाढली असून वाहतूक व्यवस्था अनियंत्रित झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याचे आदेश डीसीपी धुमाळ यांना दिले होते. त्या अनुषंगाने राजा पेठ, गाडगे नगर, फ्रेझरपुरा या तिन्ही झोनचे वाहतूक पोलीस अलर्ट झाले असून वाहतूक पोलीस निरीक्षक रीता उईके, वाहतूक पोलीस निरीक्षक प्रवीण वांगे यांनी पंचवटी चौकात वाहतूक व्यवस्थेची पाहणी केली . यावेळी सायबर सेल ची एपीआय अनिकेत कासार यांची उपस्थिती होती. सध्या उन्हाचा तडाका वाढला असून नागरिकांना सुरक्षित वाहतूक होण्याच्या दृष्टिकोनातून पोलिसांकडूनही चांगले पावले उचलले जात आहेत.




भानखेडा येथील महिलेवर झालेल्या अत्याचार प्रकरणात आरोपीला फाशीची शिक्षा झाली पाहिजे. या मागणीसाठी पोलीस आयुक्त कार्यालयासमोर प्रहार चे पदाधिकारी बंटी रामटेके यांच्या नेतृत्वात नागरिकांनी आंदोलन करून गंभीर शिक्षेची मागणी केली आहे.

# मेळघाटातील कंत्राटी शिक्षकांचे बेमुदत काम बंद आंदोलन

प्रतिनिधी २ एप्रिल



**अमरावती :** जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत पेसा मेळघाट क्षेत्रातील सर्व कंत्राटी शिक्षक यांचे जिल्हा परिषद समोर गेल्या तीन दिवसापासून बेमुदत काम बंद व धरणे आंदोलन सुरू आहे.

त्यांच्या विविध मागण्या आहेत.

यामध्ये ५०ज्ञ् खुल्या प्रवर्गातील जागांवर प्रथम प्राधान्य: ११ फेब्रुवारी २०२६ च्या शासन निर्णया नुसार, रिक्त पदांपैकी ५०ज्ञ् खुल्या प्रवर्गातील जागांवर सध्या कार्यरत कंत्राटी शिक्षकांना प्राधान्याने सामावून घ्यावे व उर्वरित जागा पवित्र पोर्टलला द्याव्यात.

सर्व कंत्राटी शिक्षक TET/CTET व TAIT 2022 अभियोग्यता धारक (पात्र) शिक्षकांना कायम करा.

, शिक्षण सेवक पद लागू करा: कंत्राटी शिक्षकांना तातडीने 'शिक्षण सेवक' पद लागू करून त्यांना नियमित शासकीय सेवेत समाविष्ट करावे.

मागील सेवा ग्राह्य धराः पेसा क्षेत्रांतर्गत कार्यरत कंत्राटी शिक्षकांची मागील संपूर्ण सेवा अनुभव आणि इतर लाभांसाठी ग्राह्य धरण्यात यावी.

जोपर्यंत मागण्या मान्य होत नाही. तोपर्यंत लढा सरूच राहील असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

या आंदोलनात, शिक्षक किशोर वानखडे राहुल सोनार विशाल हगवणे, अविनाश उदापुरे, मंगेश आठवले, सागर सूर्यवंशी, शितल खडसे, दीपक मेमनकर प्राजक्ता दातीर, यांच्यासह ३८ शिक्षक या आंदोलन सहभागी झाले आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

गुरूवार दि २ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

प्रधान मंत्री आवास योजना ग्रामीण

# घरकुलातून भ्रष्टधिकारी मालामाल...
# सरपंचाची कमाल, घोटाळ्याची धमाल!

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिम जिल्ह्यात गाजत असलेल्या घरकुल योजनेतील कथित अनेक घोटाळे आता समोर येत आहेत. मंगरुळपीर तालुक्यातील चोरद येथील एका महिला सरपंचाने तर सत्तेचा दुरुपयोग करत जागेचा आठ अ नसतांना सुद्धा आपल्या सासऱ्याच्या नावावर घरकुलाचे अनुदान लाटले असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या बाबत चोरद येथील ग्रामस्थांनी व काही सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केली असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. हा गंभीर प्रकार उघडकीस येताच सरपंचाची कमाल, घोटाळ्याची धमाल असे अपरोधाने परिसरातील नागरिक म्हणत आहेत.

हाती आलेल्या माहितीनुसार मंगरुळपीर तालुक्यातील चोरद गावातील माजी सरपंच रूपाली भागवत काळे यांनी शबरी घरकुल योजनेंतर्गत सण २०२१/२०२२ मध्ये स्वतःचे सासरे ज्ञानदेव सूर्यभान काळे यांणा लाभ दिला होता मात्र.घरकुल प्रत्यक्ष आठवरती नसुन मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, घरकुलाचे आठवरती प्रत्यक्ष बांधकाम न करता थेट देयके वितरित केल्याचा आरोप चोरद ग्रामस्थांनी तक्रारी द्वारे केला .असून या प्रकरणी तालुक्यातील चोरद ग्रामस्थांनी व सामाजिक कार्यकर्ते नी वाशिम जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले आहे या संपूर्ण प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सन २०२१- २२ या आर्थिक वर्षात मंगरूळपीर तालुक्यातील चोरद गावाला घरकुलांना शासनाने मंजुरी दिली होती. या घरकुलांची अधिकृत यादी देखील प्रसिद्ध करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्ष पाहणीत मोजक्याच लाभार्थ्यांनीच घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले असल्याचे स्पष्ट झाले असून उर्वरित घरकुलांचे काम अपूर्ण असतांनाही, संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने बनावट कागदपत्रे, फोटो व अहवाल तयार करून मोठ्या प्रमाणावर देयके मंजूर करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

धक्का दायक बाब म्हणजे, काही ठिकाणी एकाच घरकुलाचे बांधकाम करून त्यांच ठिकाणी अनेक लाभार्थ्यांनी फोटो काढून घेतले असून.शासन व प्रशासन यांच्या डोळ्यात माती फेकून लाखो रुपयांची ऊचल केल्याचे आरोप आहेत या कधित घोटाळ्यात सरपंच ग्रामपंचायत कर्मचारी घरकुल संबंधित सर्व अधिकार व गट विकास अधिकारी तसेच पांढरे शुभ्र कपडे घालून काळ्या दलालांचा सहभाग असल्याचे खात्रीलायक वृत्त असल्याचेही थोडक्यात माहिती आहे. सामाजिक कार्यकर्ते व सुज्ञ नागरिकांच्या म्हणण्यानुसार, घरकुलाचे प्रत्यक्ष बांधकाम न झालेल्या लाभार्थ्यांकडून प्रत्येकी सुमारे पहिला १५ हजार रुपये दुसरा हप्ता सात हजार रुपये तीसरा तीस हजार आणि चौथा पाच हजारचा हप्ता देऊन त्यांना देयके मंजूर करण्यात आली. दुसरीकडे, ज्या लाभार्थ्यांनी प्रत्यक्षात घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले आहे, त्यांना मात्र बिले व देयके देण्यास संबंधित अधिकारी व कर्मचारी टाळाटाळ करत असल्याचा गंभीर प्रकार घडत आहे. यामुळे प्रामाणिक व गरजू लाभार्थ्यांवर अन्याय होत असून शासनाच्या घरकुल योजनेचा मूळ उद्देशच धुळीस मिळत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## सत्तेची दोरी हाती, घरकुल योजनेची केली माती




## घरकुलाला भ्रष्टाचाराची जोड, विस्तार अधिकारी करतात तडजोड

मंगरूळपीर पंचायत समिती चे विस्तार अधिकारी हे आर्थिक तडजोड करणाऱ्यांनाच प्राधान्य देतात. घरकुल योजनेंतर्गत बिले अदा करण्यासाठी पंचायत समिती कार्यालयात नियुक्त खाजगी स्थापत्य अभियंत्याकडून लाभार्थ्यांची आर्थिक पिळवणूक केली जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. आर्थिक तडजोड करणाऱ्यांची कामे तात्काळ केली जात असून, तडजोड न करणाऱ्या लाभार्थ्यांना मात्र वारंवार कार्यालयाच्या खेटा माराव्या लागत आहेत. कारण या कथित गैरप्रकारामुळे ज्यांना खरोखरच घरकुलाची गरज आहे असे गरजू व पात्र लाभार्थी या योजनेपासून वंचित राहत आहेत, तर दलाल व तडजोड करणारे लोक शासनाच्या पैशावर डल्ला मारत असल्याचे चित्र समोर येत आहे.कठोर कारवाईची मागणी. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी व संबंधितांवर कठोर कारवाई करावी, तसेच फसवणूक व भ्रष्टाचाराच्या प्रकरणात गुन्हे दाखल करावेत, अशी ठाम मागणी निवेदनात करण्यात आली आहे. प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने निवेदनात करण्यात आली आहे.




## थोडक्यात

### क्रांतीसूर्य महात्मा फुले जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन




● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळनाथ दिगंबर जैन समाजाच्या वतीने सत्य आणि अहिंसेचा मार्ग दाखवत संपूर्ण जगाला प्रेमाची शिकवण देणारे जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर स्वामी यांच्या जयंती निमित्त मंगरूळनाथ येथे दरवर्षी प्रमाणे शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

भगवान महावीर यांची शोभायात्रा शहरातील मुख्य मार्गाने काढण्यात आली असून जागोजागी शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. शोभायात्रेच्या दरम्यान देश पातळीवर राबविण्यात येणाऱ्या गो सन्मान आवाहन अभियानाला समर्थन देण्यात आले संपूर्ण देशात गोवंश हत्या बंदीचा कायदा करण्यात यावा गोमातेला राष्ट्रमाता घोषित करण्यात यावे, गोरक्षणा साठी राष्ट्रीय पातळीवर गोसेवा आयोग निर्माण व्हावा असा उद्देश असणाऱ्या या अभियानात सर्वांनी मोठ्या संख्येत सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले. दिगंबर जैन समाजाच्या वतीने काढण्यात आलेल्या या शोभायात्रेमध्ये प्रतिष्ठित नागरिक, महिला पुरुष , युवक,मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### 'अहिंसा परमो धर्म' चा देणाऱ्या पर्वानिमित्त मिरवणूक



● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

भगवान महावीर जयंतीनिमित्त रिसोड शहर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले होते.' अहिंसा परमो धर्म 'चा संदेश देणाऱ्या या पर्वानिमित्त शहरात भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. शेकडो भाविकांनी सहभागी होत रिसोड शहरात भगवान महावीरांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील विविध भागातून निघालेल्या या मिरवणुकीत पारंपरिक वेशभूषा, भगवान महावीरांची प्रतिमा असलेला आकर्षक रथ हे या मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरले. मंगलमय गजरात आणि महाविरांच्या घोषणांनी आसमंत दुमदुमून गेला होता. शहरातील अनेक ठिकाणी फुलांची उधळण करत मिरवणुकीचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले होते.

या मिरवणुकीत ज्येष्ठ नागरिकांसह युवक-युवती आणि लहान मुला-मुलींचा उत्स्फूर्त सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. लहानग्यांच्या उत्साहाने आणि महिलांच्या सहभागाने मिरवणुकीला वेगळेच आकर्षण प्राप्त झाले होते.मिरवणूक जैन मंदिर, अप्पा स्वामी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चांदणी चौक अशा प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. मिरवणूक पुन्हा जैन मंदिरात परतल्यानंतर भगवान महावीर स्वामी यांचा विधीपूर्वक अभिषेक व पूजन करण्यात आले. यावेळी भाविकांनी मोठ्या श्रद्धेने प्रार्थना करून आपल्या जीवनात अहिंसा, सत्य आणि संयम यांचे पालन करण्याचा संकल्प केला.

या भव्य सोहळ्यामुळे रिसोड नगरीत दिवसभर धार्मिक उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. भगवान महावीरांच्या शिकवणुकीचा संदेश जनमानसात पोहोचवणारा हा महोत्सव संस्मरणीय ठरला.

## पवित्र पोर्टलही झाले अपवित्र, शिक्षक भरती घोटाळा विचित्र...
# शिक्षण अधिकारी कपटी, भरतीत फिफ्टी - फिफ्टी !

* शिक्षण विभागातील खादाड अधिकाऱ्यांचा प्रताप
* जिल्ह्यातही पटसंख्या कमी असताना पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरती

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शासनाने खाजगी संस्थाद्वारे सुरु असलेल्या शाळा व उच्च माध्यमिक शाळांमध्ये ज्ञानदानाचे कार्य प्रामाणिक पणे व्हावे ,गुणवान शिक्षकांची नियुक्ती व्हावी आणि पारदर्शकता असावी या उदात्त दृष्टीकोनातून पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षक भरती करण्याचा धाडसी निर्णय घेतला आहे. या निर्णयाला शिक्षण विभागातील खादाड अधिकाऱ्यांनी वाटाण्याच्या अक्षदा लावून पवित्र पोर्टल ला अपवित्र करून अनेक शाळांमध्ये पदभरतीसाठी आवश्यक असलेली पटसंख्या नसतांना पदभरती करून फिफ्टी-फिफ्टीचा फॉर्म्यूला अंमलात आणल्याची चर्चा आहे. या प्रकारामुळे वाशीम जिल्ह्यातील शिक्षण विभागातील गैरप्रकार पुन्हा चव्हाट्यावर येण्याचे संकेत प्राप्त झाले आहेत.

मागील अनेक वर्षापासुन वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभाग विविध गैरप्रकारामुळे राज्यात बदनाम झालेला आहे.मागील १४ वर्षाच्या कार्यकाळात जे अधिकारी कार्यरत होते त्यापैकी काही अधिकाऱ्यांचा अपवाद सोडून इतर अधिकाऱ्यांनी गैरप्रकाराला प्राधान्य देवून आपले उखळ पांढरे करून घेतल्याची चर्चा आहे.

तसेच प्रभारी अधिकाऱ्यानी सुद्धा खाबूगिरीला प्राधान्य देवून कोट्यवधीची माया जमा केल्याची शिक्षण विभागात चर्चा आहे. वाशीम जिल्ह्यातील अनेक खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये व्यवस्थापनातील दोन गटात वाद आहेत. संस्थेतील वादाचा फायदा घेवून कथित अधिकाऱ्याने काही वादग्रस्त शाळांमध्ये पदभरतीसाठी आवश्यक असलेली पटसंख्या नसतांना संचमान्यतेत रिक्त पदे मॅनेज करून पवित्र पोर्टलमध्ये त्या रिक्त जागा दाखवून शिक्षकांची भरती केल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे.या पवित्र पोर्टलमध्ये अपवित्र कार्य करुन संस्थाचालकातील एका गटाला हाताशी धरून फिफ्टी- फिफ्टीचे धोरण राबवून आपल्या मर्जीतील उमेदवारांची भरती करून मोठ्या प्रमाणात अपसंपदा जमा केल्याची चर्चा आहे. शासनाने पवित्र पोर्टलच्या माध्यमातून पदभरती प्रकरणाचा एसआयटी द्वारे तपास करण्याची गरज आहे.या पदभरतीत जबाबदार असलेल्या कथित अधिकारी, संस्थानिकाची सखोल चौकशी करण्याची मागणी जनतेकडून होत आहे.







### घोटाळा पुन्हा पुन्हा ,दाखल होणार गुन्हा...

शालेय शिक्षण विभागातील शालार्थ आयडी घोटाळ्यात नागपूर विभागात दाखल गुन्ह्यांची चौकशी करणाऱ्या विशेष तपास पथकाला आता राज्यभरातील गुन्ह्यांची चौकशी करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. नागपूर शहरातील पोलिस उपायुक्त नित्यानंद झा हे या एसआयटीचे प्रमुख आहेत. शालार्थ घोटाळ्यात जिथे जिथे राज्यात गुन्हे दाखल झालेले आहेत तिथे तिथे चौकशी करण्याचे काम आता ही एसआयटी करेल. विशेष पोलिस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) मनोज शर्मा यांनी अलिकडेच या संबंधीचा आदेश काढला आहे. शालार्थ आयडी घोटाळ्याप्रकरणी चाळीसगाव (जि. जळगाव) येथे तीन गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. स्थानिक पोलिस त्याची चौकशी करत आहेत. मात्र, नागपुरातील घोटाळ्यांची चौकशी करण्यासाठी तेथील पोलिस आयुक्तांनी नित्यानंद झा यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी नेमलेली होती. शालार्थ घोटाळ्याची व्याप्ती राज्यभर असल्याचे दिसून आले आहे. या पार्श्वभूमीवर अशा सगळ्या गुन्ह्यांचा एकत्रितपणे आणि अधिक सुलभपणे तपास व्हावा यासाठी नित्यानंद झा प्रमुख असलेल्या एसआयटीला राज्यभरातील गुन्ह्यांचा तपास करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. आवश्यकतेनुसार या एसआयटीमध्ये आणखी काही अधिकाऱ्यांचा समावेश करण्याचा अधिकार या एसआयटीला असेल.




## ६ वर्षापासून चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे वेतन रोखले...
# दररोज करतात काम, तरीही देत नाहीत दाम !

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

पदयुक्ती नुसार निर्धारित कर्तव्य दररोज संबंधित परिसरात नियमित करून सुद्धा न.प. मध्ये कार्यरत २ स्वच्छता कर्मचार्यांना ६ वर्षापासून 'कोरोना कालावधीत' सुद्धा वेतन प्राप्ती पासून वंचितच ठेवण्याचा प्रकार मंगरूळपीर नगर परिषद मध्ये समोर आला आहे.




या बाबत हक्कापासून वंचित दोन्ही स्वच्छता कर्मचाऱ्यांनी वारंवार लेखी स्वरूपात न्याय देण्याची मागणी करूनही प्रशासनाने अदयाप ठोस कारवाई केलेली नसल्याने त्यांचे कुटुंबाची आर्थिक वाताहत होत आहे. कोरोना काळापासून ६ वर्षापासून व हकनाक वेतन रोखणे प्रकरणात नेमके हतबल कोण स्थानिक प्रशासकीय अधिकारी कि राजकीय पदाधिकारी असा प्रश्न उपस्थित होत आहे.

स्थानिक स्वराज्य(नप) संस्थेमध्ये सावळागोंधळ या कार्यप्रणाली ला सार्थक ठरविणारे अनेक किस्से चर्चित आहेत. दोन सफाई कामगाराचे वेतन रोखणे प्रकरण निश्चितच कर्मचाऱ्याची मुस्कटदाबी करत प्राप्त हक्कापासून येनकेन प्रकारे अडथळा कार्यपद्धत कसी राबविली जाते याचे वर्तमान उदाहरण ठरते. संबंधित विभागप्रमुख व निरीक्षक यांचेतील समन्वय अभाव कि वरिष्ठ अधिकारी यांची जाणीवपूर्वक दिशाभूल करून ठोस निर्णय प्रलंबित ठेवला जात आहे . असा प्रश्न उपस्थित होत आहे. राहुल संगत व हेमंत खरारे आपल्या कामाचे नियमित पालन करत कार्यरत आहेत. मात्र अकस्मात त्याना गैरहजर दाखवत कारणे दाखवा नोटीस बजावली. मात्र त्यामध्ये नेमून दिलेले काम नेमके काय किंवा कोणत्या काम नेमून देण्यासाठी याचा अर्थबोध होत नाही. तरी सुद्धा आर्थिक विवंचनेत फसलेल्या दोघांची न्यायोचित मागणी दुर्लक्षित असून १००३ वेतन रोखण्यात आलेले आहे.


या संदर्भात १९ मार्च ला प्र. आरोग्य निरीक्षक याचेकडून दिलेल्या नोटीस नंतर मिळालेल्या सर्व नोटीस ला अनुसरून या दोन्ही कामगारांनी वेळोवेळी लेखी खुलासा सादर करून सुद्धा काहीच कारवाई होत नसल्याने तसेच मुख्याधिकारी, जिल्हा प्रशासन अधिकारी व वरिष्ठ कार्यालाकडून प्राप्त निर्देशाची सुद्धा अंमल बजावणी न होणे ? यामुळे या सर्व प्रकार संबंधित विभाग प्रमुख, प्र निरीक्षक तसेच सफाई जमादार यांचे वास्तविक कार्यक्षमतेवर प्रश्न चिन्ह लावण्यात सक्षम आहे.

मंगरूळपीर नप मध्ये ३३ सफाई कामगार नियुक्त आहेत. यात स्वतः किती काम करतात व किती बदलीदाराकडून करवून घेतात हे सर्वांना कळत असूनही नप प्रशासनाला वळत नाही हा देखील आश्चर्यजनक प्रकार असला तरी संबंधित विभाग प्रमुख व निरीक्षक यांची भूमिका मवाळ आहे. २ सफाई कामगाराचे वेतन रोख प्रकरणी मात्र टाळाटाळ नीती कणखर कसी, हा सुध्दा चर्चेचा विषय बनला आहे.

## जिल्हा बँकेच्या निवडणुकीत...
# राम ठाकरे विजयी!

### सहकार क्षेत्रात ठाकरे घराण्याचे निर्विवाद वर्चस्व कायम

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●



राजकीयदृष्ट्या अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत रामेश्वर सुभाषराव ठाकरे यांनी ऐतिहासिक विजय मिळवला आहे. या निकालाने माजी मंत्री तथा जिल्ह्यातील वजनदार नेते सुभाषराव ठाकरे यांचे सहकार क्षेत्रातील आपले निर्विवाद वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध झाले असून, विरोधी गटाला मोठ्या पराभवाचा धक्का बसला आहे.

अकोला-वाशीम जिल्हा मध्यवर्ती निवडणुकीत तालुक्यातील एकुण ६६ मते होती. सुरुवाती पासुनच रामेश्वर सुभाषराव ठाकरे यांचे पारडे जड होते आणि निकालाने त्यावर शिक्कामोर्तब केले. विजयी उमेदवार रामेश्वर सुभाषराव ठाकरे यांना ५० मते तर, विरोधी गटाच्या उमेदवार सौ संजीवनी आनंद राऊत यांना १५ मते पडली. तर एक मत अवैद्य ठरले या विजयाने रामेश्वर सुभाषराव ठाकरे यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्याचा ५० मतांच्या प्रचंड फरकाने पराभव केला. जो या निवडणुकीतील चर्चेचा विषय ठरला आहे. रामेश्वर सुभाषराव ठाकरे हे जिल्ह्यातील वजनदार नेते सहकार महर्षी, माजी मंत्री सुभाषराव ठाकरे यांचे धाकटे चिरंजीव आहेत. सहकार नेते यशवंतराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनात माजी मंत्री सुभाषराव ठाकरे यांनी जुन्या मंगरूळपीर मतदारसंघात सहकार क्षेत्राची बाजू भक्कम करून शेतकरी शेतमजुरांना न्याय दिला, त्यांच्यापासून सुरू असलेला सहकाराचा वारसा रामेश्वर ठाकरे यांच्या विजयाने अधिक भक्कम केला आहे. माजी जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांच्या कुशल नियोजनामुळे विजय सुकर झाला.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
गुरुवार, दि. २ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# श्री रेणुकामाता संस्थान जनुना येथे यात्रा महोत्सव

♦ बारा बैलगाडी ओढून मंदिराला घालतात प्रदक्षीणा

प्रतिनिधी २ एप्रिल

**खामगाव :** प्राचीन व जागृत देवस्थान म्हणून शहरालगतच्या जनुना येथील रेणुका मातेचे मंदिर प्रसिद्ध आहे. १५० वर्षापूर्वीचा इतिहास असलेल्या श्री रेणुका मातेचे मंदिरात आज ता. २ एप्रिल रोजी हनुमान जयंतीच्या दिवशी भव्य यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

जनुना गावाचे ग्रामदैवत असलेले श्री रेणुका मातेचे मंदिर अत्यंत प्राचीन असून तालुक्यासह पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे. मंदिराचा परिसर निसर्गरम्य वातावरणात असून कोरीव काम केलेल्या पाषाणाच्या या मूर्तीची टेकडीवर मंदिर बांधून स्थापना करण्यात आली. कालांतराने रेणुका मातेच्या मंदिराचा भक्तांच्या सहकार्यातून जीर्णोद्धार करण्यात आला. त्याठिकाणी नवीन मंदिराचे बांधकाम करण्यात आले आहे. भाविकांनी देणगी स्वरूपात केलेल्या मदतीमुळे मंदिर परिसराचे व टेकडी सौंदर्याचे कामही झाले आहे. मंदिरात विराजमान असलेली कोरीव काम केलेली रेणुका मातेची मूर्ती व त्यावर चढवलेला सोन्या-चांदीचा साजश्रृंगार पाहून मन प्रसन्न होते. मंदिर परिसरात लक्ष्मी माता, सागर माता,



शिवमंदिर व दीपमाळ, फक्कड बाबा यांची समाधी आहे. येथे नवरात्र उत्सवही मोठ्या उत्साहात साजरा होतो. तर हनुमान जयंतीला रेणुका मातेची भव्य यात्रा भरते. शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या या यात्रा महोत्सवाचे दिवशी बारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम देखील होतो. जनुना गावातील मानकरी वाजत गाजत मंदिरावर येतात आणि टेकडीवर असलेल्या मंदिराला बारा गाड्या ओढून प्रदक्षीणा मारतात तसेच पंचक्रोशीतील भाविक आवर्जुन या दिवशी दर्शनाकरीता येतात. यावेळी यात्रेत मोठ्या प्रमाणात विविध वस्तुंची दुकाने देखील सजतात. दरम्यान भाविकांसाठी महाप्रसाद म्हणून १६ ते १७ क्विंटल गव्हाच्या पोळ्या व वांग्याची भाजीच्या महाप्रसादाचे वाटप करण्यात येते. मातेच्या मंदिरात नवस म्हणून कोणत्याही प्रकारचा पशुबळी दिला जात नाही. यावर्षी हनुमान जयंतीला २ एप्रिल रोजी भव्य यायात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून सायंकाळी ५ वाजता महाआरती झाल्यानंतर प्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. तरी सर्व भाविक भक्तांनी यात्रा महोत्सवात दर्शन आणि प्रसाद घेण्याकरीता उपस्थित रहावे असे आवाहन विश्वस्त मंडळ, श्री. रेणुका माता संस्थान, जनुना यांचे वतीने करण्यात आले आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघनप्रकरणी गुन्हा दाखल

प्रतिनिधी २ एप्रिल

**बुलडाणा :** जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन करत, सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर मांस विक्री केल्याप्रकरणी बुलडाणा शहर पोलिसांनी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई ३१ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास शहरातील स्त्री रुग्णालयाच्या प्रवेशद्वारालगत असलेल्या मोकळ्या सार्वजनिक जागेत करण्यात आली. पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, बसस्थानक ते धाडनाका मार्गावरील परिसरात एक व्यक्ती उघड्यावर मांस विक्री करत आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांना बोलावून घटनास्थळी छापा टाकला. तेव्हा शेख शाहरुख शेख बाबर, (रा. मुठे ले-आऊट) हा ग्राहकांना उघड्यावर मांस विक्री करताना आढळून आला. पोलिसांनी विचारपूस केली असता, हॉटेल व्यावसायिकांकडून 'ऑर्डर' असल्यामुळे मासं विक्री करत असल्याचे सांगितले.

## ६४ कोटींची ती योजना पूर्ण करा!

♦ जिल्हाधिकाऱ्यांना कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांचे निवेदन

प्रतिनिधी २ एप्रिल

**बुलडाणा :** खडकपूर्णा प्रकल्पाच्या डाव्या कालव्याद्वारे शिवणी आरमाळसह १४ गावांना सिंचनासाठी पाणी देण्याच्या मागणी करीत, कैलास अर्जुनराव नागरे कृती समितीच्यावतीने १ एप्रिल रोजी पालकमंत्री मकरंद पाटील यांना निवेदन दिले. हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही निवेदनातुन दिला. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या माध्यमातून हे निवेदन देण्यात आले.

या निवेदनात, शासनाने मंजूर केलेल्या सुमारे ६४ कोटी रुपयांच्या प्रस्तावित सिंचन योजनेची अंमलबजावणी लवकरात लवकर करावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. पाणीप्रश्नासाठी गेल्यावर्षी आंदोलन करताना प्राणार्पण केलेल्या कैलास नागरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त गावकऱ्यांनी १३ एप्रिल २०२६ पर्यंत ही योजना पूर्ण करण्याचा संकल्प व्यक्त केला होता. मात्र, वर्ष उलटूनही प्रत्यक्ष कामाला गती मिळालेली नसल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. नागरे यांच्या बलिदानाची दखल घेत त्यांच्या पत्नी स्वाती नागरे यांना २५ लाखांची आर्थिक मदत जाहीर करावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. हे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनापर्यंत पोहोचविण्यात आले असून, येत्या आठ दिवसांत याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा कृती समितीने व्यक्त केली आहे. या वेळी अ?ड. अविनाश काळे यांच्यासह उमेश आरमाळ, योगेश आरमाळ, स्वाती कैलास नागरे, गजानन डोईफोडे व अन्य उपस्थित होते. एकीकडे पाण्यासाठी दिलेले बलिदान, तर दुसरीकडे रखडलेली योजना या विरोधाभासामुळे शिवणी आरमाळ परिसरातील ग्रामस्थांमध्ये नाराजी वाढत आहे.

# मानधन वाढ रखडल्याने जिल्ह्यातील ग्रामरोजगार सहायकांचे कामबंद आंदोलन

♦ जिल्ह्यातील ८५० सहायक आंदोलनात सहभागी

प्रतिनिधी २ एप्रिल

**खामगाव :** मानधनवाढीचा शासन निर्णय जाहीर होऊनही प्रत्यक्ष अंमलबजावणी न झाल्याने जिल्ह्यातील ग्रामरोजगार सहाय्यकांनी १ एप्रिलपासून कामबंद आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा इशारा संघटनेने दिला असून, सुमारे ८५० सहाय्यक या आंदोलनात सहभागी झाले आहेत.

रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी गावपातळीवर प्रभावीपणे करणाऱ्या या सहाय्यकांना अनेक वर्षे अत्यल्प मानधनावर काम करावे लागत आहे. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर मानधन वाढविण्याची मागणी राज्यभरातून सातत्याने होत होती. त्यानुसार शासनाने ऑक्टोबर २०२४ मध्ये दरमहा ८ हजार रुपये मानधन आणि २ हजार रुपये डेटा भत्ता देण्याचा निर्णय जाहीर केला; मात्र सहा महिन्यांहून अधिक काळ उलटूनही या निर्णयाची अंमलबजावणी न झाल्याने तीव्र नाराजी आहे. निर्णय झाला, पण लाभ नाही, अशी भूमिका घेत ग्रामरोजगार सहाय्यकांनी अखेर कामबंद आंदोलन छेडले. आंदोलनात जिल्हाध्यक्ष श्रीमंत देशमुख, पृथ्वीराज गवई, संजय मोरे, ज्ञानेश्वर गावडे, सुरज रगड, दीपक गवई, अर्जुन ढगे, मदन खरात, दिनकर मोरे व अन्य सहभागी झाले आहेत.

# वृध्दाची आजाराला कंटाळून आत्महत्या

प्रतिनिधी २ एप्रिल

**खामगाव :** आजाराला कंटाळून एका ८२ वर्षीय वृद्ध इसमाने आत्महत्या केल्याची घटना खामगाव तालुक्यातील गोंधनापूर येथे घडली आहे.

प्राप्त माहितीनुसार, तालुक्यातील गोंधनापुर येथील रहिवासी शंकर मारोती करांगळे (८२) यांना बऱ्याच वर्षापासुन पोटाचा व दम्याचा आजार होता. या आजाराला कंटाळुन त्यांनी वाघळी येथील पाझर तलावाच्या काठावरील निंबाच्या झाडाला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास उघडकीस आली होती. त्वरीत रुख्माई फाऊंडेशनच्या टिमला पाचारण करण्यात आले होते. संजय खंडेराव यांच्या मार्गदर्शनाखाली टीमने शव झाडावरून खाली उतरविले होते. याप्रकरणी विजय शालिग्राम खंडारे यांनी खामगाव ग्रामीण पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये कलम १९४ भानासुसं नुसार मर्ग दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास एएसआय भगवान काळबागे करीत आहेत

# भर उन्हात सिलिंडरसाठी रांगा; गोडावूनवर गर्दी

प्रतिनिधी २ एप्रिल

**सोनाळा :** जिल्हा पुरवठा विभागाच्या दुर्लक्षामुळे गॅस कंपनीची मनमानी वाढली आहे. संग्रामपूर येथे गॅस सिलेंडरसाठी भर उन्हात अर्धा किमीच्या रांगा लागल्या आहेत.

संग्रामपूर येथील गुरुकृपा इण्डेनला मागणी पेक्षा पुरवठा निम्मा करून अघोषित आणीबाणी तयार झाली आहे. एकीकडे सिलेंडर मिळत नसल्याने दूसरीकडे काळ्या बाजारात १८०० रुपयांमध्ये सिलेंडर मिळत असल्याने येथील प्रशासन बिळात जावून बसले आहे का? असा खडा सवाल विचारल्या जात आहे.

जनतेला सिलेंडरसाठी वेठीस धरलेल्या शासकीय यंत्रणे कडे याचे उत्तर नाही. त्यामुळे घरपोच सिलेंडरचा बोजवारा उडालेला आहे. ५ दिवसाचे कालखंडानंतर संग्रामपूर येथे १ एप्रिल रोजी इण्डेन गॅस पुरवठा करण्यात आला. त्यासाठी खेड्या पाडयातून अनेकांनी हक्काच्या सिलेंडरसाठी तोबा गर्दी केली. गर्दी वाढल्याने पोलीसपण डेरे दाखल झाले. अत्यावश्यक सेवेचे तीन तेरा वाजविण्यासाठी स्थानिक प्रशासन जबाबदार असल्याचे नागरिक बोलत आहे. अघोषित आणीबाणीव सिलेंडर तुटवड्याबाबत कंपनीचे एरिया मॅनेजर कुलदिप सिंग यांनी सिलेंडरचा पुरवठा मनमाड डेपोतून बरोबर आहे. त्यामुळे या बाबत एजन्सीकडे बोट दाखविले. गॅस वितरण बाबत लक्ष देण्याचे आश्वासन पण त्यांनी दिले. या बाबत इण्डेन कंपनीच्या अनियमित सिलेंडर पुरवठया बाबत सोनाळा येथील गजानन संपत तायडे यांनी जिल्हाधिकारी यांचे कडे तक्रार केली आहे. तक्रारीत नमूद आहे की स्थानिक तहसिलदार व पुरवठा अधिकारी यांनी जाणीव पूर्वक दुर्लक्ष केले. त्यामुळे सामान्य झाली आहे. स्थानिक एजन्सीवर प्रशासनाचे नियंत्रण नाही. त्यामूळे जनतेचे हाल बेहाल आहेत. यावर तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी सुद्धा तक्रारीतूनकरण्यात आली आहे.

# फेस योगा प्रशिक्षण कार्यशाळेचा समारोप उत्साहात

प्रतिनिधी २ एप्रिल

**खामगाव :** विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ, खामगाव द्वारा संचालित गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव येथील गृह अर्थशास्त्र व आरोग्य, स्वच्छता समितीच्या वतीने आयोजित फेस योगा प्रशिक्षण कार्यशाळेचा समारोप कार्यक्रम दि. २७ मार्च २०२६ रोजी ऑनलाइन (झूम मीट) माध्यमातून उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून डॉ. जया डबरासे उपस्थित होत्या.त्यांनी आपल्या मार्गदर्शनातुन फेसयोगा नाविन्यपूर्ण स्तुत्य उपक्रम असुन अतिशय आवश्यक व महत्त्वाचा उपक्रम राबविण्यात आला असे प्रतिपादन केले. मार्गदर्शक व फेसयोगा च्या प्रशिक्षीका म्हणून डॉ. गुलबक्षी मोहोकार (एम.डी. होमिओपॅथी, योगतज्ञ, अकोला) यांनी महिलांच्या आरोग्यासाठी फेस योगाचे महत्त्व पटवून देवुन त्यांच्या मध्ये फेसयोगा संदर्भात जागरूकता आपल्या प्रशिक्षणातुन निर्माण केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर होते.त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगता तुन कोणत्याही कूतीकरीता आपल्या मध्ये सातत्य असणे आवश्यक असते असे प्रतिपादन करुन उपक्रम आयोजन समितीचे तसेच उत्कृष्ट प्रशिक्षका म्हणून डॉ.मोहोकार मॅडम चे सर्वांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नीता बोचे गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख यांनी प्रभावीपणे केले. त्यांच्या सुबोध व प्रभावी निवेदनामुळे कार्यक्रम रंगतदार झाला. या कार्यशाळेत सहभागी पैकी प्रा. डॉ. चव्हाण मॅडम नागपूर प्रा. डॉ. कांचन थोरात बाळापूर, कु. रेणुका काळे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर, भाग्यश्री सापधारे जि.एस.कॉलेज खामगाव तसेच महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी कु.दिक्षा खोडे ,कु. पुजा बोचरे यांनी आपले अनुभव व्यक्त करताना सांगितले की, फेस या संदर्भात आमच्या मध्ये जागरूकता निर्माण झाली आणि योगामुळे खुप फायदा होवुन आत्मविश्वासात वाढ झाली आहे.सोबतच असेच नाविन्यपूर्ण उपक्रम महाविद्यालय राबवत असुन निश्चितच सर्व विद्यार्थ्यांनीं व महिला बघीणिंना फायदा होतो असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. कोमल काळे यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी आरोग्य व स्वच्छता समितीचे समन्वयक प्रा. कोमल ह. काले तसेच समिती सदस्य प्रा. सुहास पिढेकर, प्रा. उमेश खंदारे, प्रा. वर्षा कोकाटे, प्रा. ज्योती शर्मा , स्वाती खोडके यांनी विशेष परिश्रम घेतले. ही कार्यशाळा दि. २१ ते २६ मार्च २०२६ दरम्यान ऑनलाइन पद्धतीने आयोजित करण्यात आली असल्याने या कार्यशाळेला अकोला अमरावती, नागपुर, बुलढाणा, अहिल्यानगर, पुणे अशा विविध स्तरावरून विद्यार्थीनी व महिलांचा उस्फुर्त प्रतिसाद मीळाला. अशी माहिती महाविद्यालयाचे प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

# एकाच रात्री सहा शेतकऱ्यांच्या पाणबुडी मोटारी लंपास!

♦ पिंप्री कोळी शिवारातील घटना, गुन्हा दाखल

प्रतिनिधी २ एप्रिल

**खामगाव :** नांदुरा शहरानंतर चोरट्यांनी आता शेतातील कृषी उपयोगी साहित्य लंपास करण्याकडे मोर्चा वळविला आहे. यामध्ये तालुक्यातील पिंप्री कोळी शेतशिवारात अज्ञात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, पूर्णा नदीपात्रातून सहा शेतकऱ्यांच्या पाणबुडी मोटारी लंपास केल्याची घटना समोर आली आहे. सावरगाव नेहू येथील शेतकरी सुपडा बोरसे (५५) हे पिकाला पाणी देण्यासाठी शेतात गेले होते. मात्र, लाइन असूनही मोटार सुरू होत नसल्याने त्यांनी नदी पात्रात जाऊन पाहणी केली असता, त्यांच्या मोटारीची केबल कापलेली होती आणि ७.५ हॉर्सपॉवरची मोटार गायब होती. बोरसे यांनी आजूबाजूच्या शेतकऱ्यांना विचारणा काली असता, केवळ त्यांचीच नव्हे तर परिसरातील कैलास सुलताने, देवानंद रावणचवरे, भागवत बावस्कार, वासुदेव जानवरसे, अर्जुन यांच्या मोटारी चोरीला गेल्याचे स्पष्ट झाले. चोरट्यांनी एकाच रात्री ६ शेतकऱ्यांच्या ७.५ एचपीच्या मोटारी लंपास केल्या. चोरी गेलेल्या मोटारीची किंमत अंदाजे ३५ हजार रुपये आहे.या प्रकरणी चांदूर बिस्वा दूरक्षेत्राचे पोलिस कर्मचारी वाघ यांनी फिर्याद सादर केल्यानंतर नांदुरा पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध कलम ३०३ (२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नमो सन्मान'चा आठवा हप्ता जमा; नवव्या हप्त्याची प्रतीक्षा!

♦ वितरणात विलंबामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी !

प्रतिनिधी २ एप्रिल

**खामगाव :** जिल्ह्यात नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा आठवा हप्ता पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाल्याने काहीसा दिलासा मिळाला आहे; मात्र, पुढील नवव्या हप्त्याची प्रतीक्षा अजूनही कायम असून, शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

'नमो शेतकरी महासन्मान निधी योजना' ही राज्य सरकारने केंद्राच्या पीएम किसान योजनेच्या धर्तीवर सुरू केलेली योजना आहे. पीएम किसान योजनेच्या एकविसाव्या हप्त्यासोबत नमो सन्मान योजनेचा आठवा हप्ता वितरित होणे अपेक्षित होते; मात्र तसे झाले नाही. तसेच, पीएम किसानच्या २२व्या हप्त्यासोबत नमो सन्मान योजनेचा नववा हप्ता मिळेल, अशीही शेतकऱ्यांची अपेक्षा होती. दरम्यान, आता राज्य सरकारकडून नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा आठवा हप्ता पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आला आहे. जिल्ह्यातील यामुळे हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. रब्बी हंगामातील कामांसाठी या निधीचा उपयोग होत असताना, आता जिल्ह्यातील बळीराजाला नवव्या हप्त्याची प्रतीक्षा लागली आहे.

**केवायसी'चा पेच कायम**

जिल्ह्यातील अनेक शेतकरी अद्यापही तांत्रिक कारणांमुळे या लाभापासून वंचित आहेत. ज्या शेतकऱ्यांचे ईकेवायसी पूर्ण नाही किंवा ज्यांचे बँक खाते आधार कार्डाशी लिंक नाही, अशा शेतकऱ्यांचा आठवा हप्ता अडकला आहे. कृषी विभागाने वारंवार आवाहन करूनही काही तांत्रिक त्रुटींमुळे लाभार्थी यादीतून नाव सुटल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट — संमिश्र

# पुंडा नंदीग्राम मध्ये हनुमान जयंती साजरी

वि प्रतिनिधी २ एप्रिल

**अकोट :**विदर्भातील तीन स्वयंभू नंदीपिठातील दोन नंदीपिठ हे अकोट तालुक्यात आहेत. त्यामध्ये एक अकोटमध्ये नंदीपेठ मधील नंदीकेश्वर मंदिर तर दुसरे 'नंदीग्राम' अशी ओळख असणाऱ्या पुंडा येथे आहे. तर तिसरे यवतमाळ जिल्ह्यातील कळंब येथे आहे.

भगवान महादेव पार्वती विवाह सोहळा थाटामाटात साजरा केला जातो. ज्याला ऐतिहासिक संदर्भ आहेत. या सोहळ्यात सप्ताहभर अखंड हरिनाम कीर्तन पार पडते व हनुमान जयंतीच्या पूर्व संध्येला पारंपरिक रथ उत्सव साजरा होतो. या सोहळ्यात माहेरवाशीण मोठ्या संख्येने सहभागी होतात आणि आपल्या ५ वर्षाचे मुलाबाळांना रथाला पाळणे बांधून पारंपरिक पद्धतीने झुलवले जातात.

रथावर उत्सव मूर्ती बसविलेली असते. पारंपरिक पद्धतीने हभप अनंत महाराज अवारे यांचे कीर्तन संपल्यानंतर रात्री ११ नंतर रथावर उत्सव मूर्तीसह गावात नगर प्रदक्षिणा होते. यामध्ये सर्वच जाती-धर्माचे लोक मोठ्या उत्साहात सहभागी होतात. याला पौराणिक महत्व आहे. महादेव पार्वतीचा विवाह सोहळा पाहण्यासाठी विदर्भातील अनेक लोक यावेळी पुंडा गावामध्ये येत असतात. महादेव-पार्वती विवाह सप्ताहाच्या कीर्तन मध्ये २५ मार्चला गावातील ढोलाचे भजन व महादेव पार्वती विवाह



सोहळा, २६ मार्च हर्षल महाराज ढोरे शिवपूर, २७ मार्च निवृत्ती महाराज मानकर भुईखेड, २८ मार्च अच्चूत महाराज पाटील व्याळा, २९ मार्च शिवाजी महाराज मानकर भुईखेड, ३० मार्च गटविकास अधिकारी बंडू नाना महाराज पजई खामगाव, ३१ मार्च उमेश महाराज भाकरे आळंदी देवाची, तर २ एप्रिलला सकाळी ८ वाजता गावात पालखीसह नगर प्रदक्षिणा तसेच वासुदेव महाराज खोले गुरुजी यांचे काल्याचे कीर्तन व हभप मापारी महाराज तसेच भजनी मंडळ बांबर्डा यांचे ढोलाचे भजन काला वाटप त्याचप्रमाणे भव्य महाप्रसाद राहील.

# श्री गणेश जय रामनाथ महादेव संस्थांनात हनुमान जयंती

♦ मंदिरावर विद्युत रोषणाई सुशोभीकरण, महिलांचे पारायण

प्रतिनिधी २ एप्रिल

**अकोट :** वडाळी देशमुख येथील तीर्थक्षेत्र श्री गणेश जय रामनाथ महादेव संस्थानात हनुमान जयंतीला श्री संत चतुर्भुज महाराज यांचे पारायण व जन्मोत्सवा निमित्ताने दीपोत्सव होईल.

श्री हनुमान जयंतीच्या शुभ पर्वावर श्री संत चतुर्भुज महाराज यांच्या समाधी प्रगट स्थळ मंदिरावर आकर्षक रोषणाई, परिसर स्वच्छता आणि आकर्षण रंगरंगोटी व सभा मंडपामध्ये २ एप्रिलला सकाळी ९ ते १ वाजेपर्यंत एक दिवसीय पारायण सोहळा वाचक श्री हभप वैभव महाराज वसु, लोतखेळ यांच्या वाणीतून हजारो पंचक्रोशीतील महिलांच्या उपस्थितीत पार पडला. महाराजांची आरती झाल्यानंतर भाविकांना गोपाल किसन पोटदुखे यांनी महाप्रसादाचे आयोजन केले.

प्राचीन विहीरीच्या पाण्याने महाराज अभिषेक करायचे. विहीरीचे जल भाविक



तीर्थ म्हणून घेतात. चतुर्भुज महाराज अन्न त्यागी असल्यामुळे त्यांच्या जन्मदिवसावर सर्व भाविकांना विविध फळफळांचे प्रसाद म्हणून वाटप करण्यात आले.

श्री हनुमंतरायाच्या जन्माच्या दिवशी श्री संत चतुर्भुज महाराजांचा जन्मदिवस एकाच दिवशी येत असून मोठ्या भावभक्ती वातावरणामध्ये समाधी मंदिर स्थळ सभा मंडपामध्ये महाराजांचा प्रगट दिन साजरा होणार आहे. त्याच निमित्ताने जन्मदिवस उत्सव महिला वर्गाच्या उपस्थितीत दीप उत्सव साजरा होणार आहे. या उत्सवामध्ये महिला भगिनींनी व तसेच भाविकांनी श्री गणेश जय रामनाथ महादेव संस्थान वडाळी देशमुख मध्ये गुरुवार ला सायंकाळी ७ वाजता पार पडणाऱ्या या महादिप उत्सवाला हजारोच्या संख्येत पंचक्रोशी मधील महिलांनी उपस्थिती लावावी व दीपोत्सव



अनोख्या कार्यक्रमाची शोभा वाढवावी अशी विश्वस्त आयोजकाकडून भाविकांना आवाहन करण्यात आले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

गुरुवार, दि. २ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com






# शहरात हनुमान जन्मोत्सवाचा उत्साह

**शहरातील हनुमान मंदिरात भक्तांची गर्दी**
**जयंतीच्या पूर्वसंध्येला शहरात निघाली भव्य शोभायात्रा**

प्रतिनिधी २ एप्रिल

**अकोला :** संकटमोचन, महारुद्र, हनुमान, बजरंगबली, मारुती, महावीर, पवनपुत्र अंजनीसुत अशा अनेक नावांनी संबोधल्या जाणाऱ्या राम भक्त श्री हनुमंताची जयंती आज संपूर्ण देशभरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली शहरातील सर्वच हनुमान मंदिरात दर्शन घेण्यासाठी भल्या पहाटेपासून ते उशिरा रात्रीपर्यंत भक्तांनी गर्दी केली होती मागील तीन ते चार दिवसापासूनच शहरातील सर्वच हनुमान मंदिरावर रंगरंगोटी करीत आकर्षक विद्युत माळांनी मंदिर सजविण्यात आले होते. सर्व मंदिरात मागील दोन दिवसांपासून सुंदर कांड हनुमान चालीसा आधी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन सुरू होते. शहरातीलच नव्हे तर भारतातील एकमेव मातृभक्त तपे हनुमान, सोमठाणा जवळील पांढरीचा मारुती, श्री राजेश्वर मंदिरातील मारुती मंदिर, जुने शहरातील मोरणा नदीकाठील पंचमुखी हनुमान मंदिर, तहसील कार्यालयातील हनुमान मंदिर, मोठ्या संतोषी माता मंदिरातील हनुमान मंदिर, सालासार बालाजी हनुमान मंदिर, राणी सती धाम मंदिरातील पंचमुखी हनुमान मंदिर अशा विविध हनुमान मंदिरात हनुमान जयंती निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते आज सकाळी मोठ्या भक्ती भावाने हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला अनेक मंदिरात गुरुवारी पहाटे तीन वाजता पासूनच अभिषेक सहा वाजता जन्मोत्सव सोहळा तर रात्री साडेआठ वाजता आयोजन करण्यात आले भारतातील एकमेव मातृभक्त तपे हनुमान मंदिरात आज हनुमान जयंती निमित्त ५७१ किलोचा महाकाय लाडूचा नैवेद्य अर्पण करण्यात आला आज दिवसभर या प्रसादाचे वितरण मंदिरात येणाऱ्या सर्व भाविकांना करण्यात आले हनुमानजीचे दर्शन घेतल्याने कुठल्याही आजाराचे निराकरण होत असून देणारी एखादी आपत्ती टळत असल्याचा अनुभव अनेक भक्तांना आहे.





## अनेक ठिकाणी महाप्रसादासाठी पेटल्या लाकडाच्या चुली

हनुमान जयंती म्हटले की शहरात सर्वत्र महाप्रसादाची धूम दरवर्षी असते. यंदा मात्र आपल्या लाडक्या हनुमंताच्या जयंतीला गॅस सिलेंडर मिळत नसल्याने अनेक भक्तांना गॅस सिलेंडर साठी इतरत्र भटकण्याची वेळ आली होती गॅस सिलिंडर अभावी महाप्रसादाची परंपरा ब्रेक होते की काय अशी भीती सर्वांना होती परंतु कोणत्याही संकटावर मात करण्याची जी हनुमंताची शक्ती होती त्याचाच आधार घेत भक्तांनी गॅस सिलेंडर ऐवजी लाकडाच्या चुली पेटवून आपल्या लाडक्या हनुमंतासाठी महाप्रसादाचा भोग तयार केला. भर उन्हातही बिचारे आचारी स्वयंपाक काम करणाऱ्या बाया चुलीवर पोळया भाजताना दिसून आल्या अनेक ठिकाणी भाविकांनी मोठ्या उत्साहात महाप्रसाद ग्रहण केला



## हनुमान जयंतीच्या पूर्वसंध्येला शहरात निघाली भव्य शोभायात्रा

हनुमान जयंतीच्या पूर्वसंध्येला शहरातील श्रीराज राजेश्वर मंदिर परिसरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली मागील काही वर्षांपासून शहरात हनुमान जयंतीला शोभायात्रा काढण्यात येते आता हळूहळू ही शोभायात्रा भव्य दिव्य प्रकारे काढण्यात येत आहे. या शोभा यात्रेत सुद्धा अनेक सार्वजनिक मंडळांनी हनुमान भक्ती पर आधारित देखावे शोभायात्रेत सादर केले, भजनी दिंड्या, आखाडे, अश्व, भगवे फेटे धारण केलेले महिला व पुरुष मोठ्या संख्येने या शोभायात्रेत सामील झाले होते. जुने शहर सिटी कोतवाली गांधी चौक होत ही शोभायात्रा वसंत टॉकीज मार्गे चित्रा टॉकीज चौकात पोहोचली या ठिकाणी शोभा यात्रेची समाप्ती करण्यात आली जागोजागी या शोभा यात्रेचे भाविकांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले.

















# ग्राहकांना घरपोच सिलिंडर देण्यास आम्ही बांधिल

**♦ हरिहरपेठेतील राजेश्वर गॅस एजन्सीच्या संचालकाचा दावा**

प्रतिनिधी २ एप्रिल

**अकोला :** राजेश्वर गॅस एजन्सीला जळगाव येथून गॅसचा पुरवठा होतो. ग्राहकांना सुरळीत पुरवठा सुरू आहे. केवायसी तसेच बुकिंग करून सिलिंडर घ्यावे. कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन एजन्सीच्या संचालकांनी केले आहे

सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन ग्राहकांनी अतिरिक्त सिलिंडर भरून ठेवू नये असे देखील संचालिका म्हणाल्या. जिल्हाधिकारी, कंपनीचे वरिष्ठ अधिकारी कृष्णकुमार यांच्या



मार्गदर्शनाखाली आम्ही घरपोच सेवा देत आहोत. तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी एन्नावार यांनी वेळोवेळी बैठक घेऊन दिलेले प्रोत्साहन उपयुक्त ठरले. ग्राहकांनी बुकिंग केल्यावर तीन चार दिवसांत सिलिंडर मिळू शकते असेही त्यांनी स्पष्ट केले.

# लिनेस क्लब कडून दिव्यांग व्यक्तीला जयपूर फूट प्रदान

प्रतिनिधी २ एप्रिल

**अकोला :** लिनेस क्लबचे घोषवाक्य एक साथ एक लक्ष्य, उज्ज्वल समाजाचे निर्माण आहे. क्लबच्या विकलांग सेवा उपक्रम अंतर्गत चोहोट्टाबाजार येथील ६६ वर्षीय व्यक्तीला जयपूर फूट उपलब्ध करून देण्यात आला.

लिनेस क्लबच्या प्रांताध्यक्षा लि. कल्पनाजी देशमुख, रिजन चेअरपर्सन लि. ममताजी सुर्या, अध्यक्षा लि. राजेश्वरी समनपुरे (जसवाल), सचिव लि. वनिता बिजवे, कोषाध्यक्षा लि. अलका उमाळे यांच्या पुढाकाराने प्रकल्प राबविण्यात आला. चोहोट्टा बाजार येथील रहिवासी, ६६ वर्षीय रामचंद्र सानगाळे यांना नुकतेच संस्थेच्या



वतीने 'जयपूर फूट' (कृत्रिम पाय) प्रदान करण्यात आला. जेव्हा त्यांच्या कौटुंबिक परिस्थितीबद्दल जाणून घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांच्या पत्नीचे डोळे पाणावले. या कुटुंबाची कहाणी दु:खाने भरलेली आहे; त्यांच्या एकुलत्या एक मुलाचा मृत्यू झाला आहे. सध्या रामचंद्रजी आपल्या सुनेसोबत आणि पाच वर्षांच्या नातीसोबत राहतात. ते पूर्वी रस्ते बांधकामाचे काम करायचे, परंतु वयाच्या या टप्प्यावर आता केवळ पेन्शन हाच त्यांच्या घराचा एकमेव आधार आहे. भेटी दरम्यान जेव्हा असे दिसून आले की त्यांच्याकडे आधीपासूनच एक जयपूर फूट आहे, तेव्हा सहजपणे त्यांना प्रश्न विचारले की, 'जेव्हा तुमच्याकडे आधीपासून पाय होता, तर तुम्ही नवीनसाठी मागणी का केली?' या प्रश्नाच्या उत्तरात रामचंद्रजींनी जे दाखवले, त्याने विचारणाऱ्याला नि:शब्द केले. त्यांनी आपला जुना कृत्रिम पाय खालच्या बाजूने दाखवला, जो पूर्णपणे घासलेला होता आणि चालण्यायोग्य नव्हता. एका गरीब कुटुंबासाठी नवीन कृत्रिम पाय मिळवणे किती कठीण असते, हे त्या घासलेल्या पायाची अवस्था सांगत होते. प्रश्न विचारणा-याला कसेसे वाटले. परंतु परिस्थिती बिकट असली तरी आत्मसन्मान महत्त्वाचा ठरतो असा अनुभव या प्रसंगातून आला.

# शिवभक्तीमुळे प्रत्येकाच्या जीवनात सकारात्मक बदल घडतो : प्रदीप मिश्रा

प्रतिनिधी २ एप्रिल

**आर्णी (यवतमाळ) :** यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी येथील सिद्धेश्वर नगरीत सुरू असलेल्या पंडित प्रदीप मिश्रा यांच्या शिवमहापुराण कथेला अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. लाखो शिवभक्तांनी या धार्मिक सोहळ्यात सहभाग नोंदविला आहे. ४० ते ४२ अंश सेल्सिअस इतक्या तीव्र उष्णतेतही भक्तांनी मोठ्या श्रद्धेने कथा श्रवणासाठी उपस्थिती लावल्याचे चित्र पाहायला मिळाले.



शर्मा यांनी सांगितले की, 'एक लोटा जल सर्व समस्यांचे समाधान आहे. भगवान महादेवावर श्रद्धेने अर्पण केलेले जल कधीही व्यर्थ जात नाही. श्रद्धा आणि विश्वासाने केलेल्या शिवभक्तीमुळे प्रत्येकाच्या जीवनात सकारात्मक बदल घडतो. मनोकामना पूर्ण होतात आणि भगवान शिवांची कृपादृष्टी कायम राहते.' त्यांच्या या विधानामुळे उपस्थित भक्तांमध्ये अधिक उत्साह संचारल्याचे दिसून आले. श्री बहिरम देव शिव महापुराण सेवा समितीच्या वतीने या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

# अकोल्यात चिमुकल्या 'श्रीजी' हिचा शाळेच्या पहिल्या दिवसाचा शाही थाट

प्रतिनिधी २ एप्रिल

**अकोला :** शाळेचा पहिला दिवस म्हणजे मुलांच्या मनातील भीती आणि पालकांची धावपळ... पण अकोल्यातील कृषीनगर भागात चित्र काहीसं वेगळं होतं. इथे भीती नव्हती तर होता एक 'सोहळा'. निमित्त होतं तायडे कुटुंबातील चिमुकल्या श्रीजी च्या शालेय जीवनाच्या श्रीगणेशाचे !

सामान्यतः शाळेत जाताना मुलं रडतात, पण श्रीजीचा प्रवेश एखाद्या विजयी मिरवणुकीसारखा झाला. घराबाहेर पडतानाच 'तुतारी'च्या सुरावलींनी परिसर दुमदुमून गेला. महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून, विद्येची देवता आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प यावेळी



दिसून आला. जेव्हा श्रीजी शाळेच्या दिशेने पाऊल टाकत होती, तेव्हा तिच्यावर गुलाबाच्या पाकळ्यांची उधळण करण्यात आली. हे केवळ फुलांचे स्वागत नव्हते, तर तिच्या पंखांना मिळालेली स्वप्नांची झळाळी होती.रामा तायडे आणि त्यांच्या कुटुंबीयांनी हा सोहळा केवळ आनंदासाठी केला नाही, तर त्यामागे एक सामाजिक जाणीव आहे.'मुलगी ही घराची शान आहे. तिच्या जन्मापासूनच आम्ही तिचे स्वागत उत्सवासारखे केले आहे. आज ती शिक्षणाच्या वाटेवर पहिले पाऊल टाकत आहे, मग हा क्षण ऐतिहासिक का नसावा?' अशी भावना तायडे कुटुंबीयांनी व्यक्त केली.यापूर्वी श्रीजीचा गृहप्रवेशही अशाच शाही पद्धतीने करण्यात आला होता, ज्यामुळे या कुटुंबाची आपल्या लेकीप्रती असलेली निष्ठा आणि स्त्री-पुरुष समानतेचा विचार स्पष्टपणे दिसून येतो.

तायडे कुटुंबाचा हा 'जल्लोष' समाजाच्या डोळ्यांत अंजन घालणारा आहे. मुलीला ओझं न समजता तिला शिक्षणाच्या प्रवाहात मानाने सामील करून घेण्याची ही पद्धत आज सोशल मीडियावरही चर्चेचा विषय ठरत आहे. कृषीनगरमधील हा उत्साह केवळ एका कुटुंबापुरता मर्यादित नसून, तो प्रत्येक त्या वडीलांसाठी आणि आईसाठी प्रेरणा देणारा आहे, जे आपल्या मुलीला शिकवून मोठे करण्याचे स्वप्न पाहतात. श्रीजीच्या या पहिल्या पावलाने अकोल्यात शिक्षणाची एक नवी 'वारी' सुरू केली आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

# कृषी उत्पन्न बाजार समितीकडून तोल काटा बंद

प्रतिनिधी २ एप्रिल

**तेल्हारा:** येथील कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत असलेला तोल काटा गेल्या तीन वर्षांपासून बंद असल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. शेतमालाचे अचूक मोजमाप करणे हे कृषी उत्पन्न बाजार समितीचे अत्यंत महत्त्वाचे कर्तव्य असताना, संबंधित प्रशासन जाणीवपूर्वक टाळाटाळ करत असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून होत आहे.

तोल काटा बंद असल्यामुळे शेतकऱ्यांना आपला माल खाजगी तोल काट्यावर मोजावा लागत आहे. या खाजगी काट्यांवर जादा शुल्क आकारले जात असून, मोजमापातही पारदर्शकता नसल्याची तक्रार आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांची मध्यवर्ती बसस्थानकाला अचानक भेट

**प्रवासी सुविधांबाबत बसस्थानकाची केली पाहणी**

प्रतिनिधी २ एप्रिल

**अकोला :**बसस्थानकावर प्रवाशांच्या सोयी-सुविधांकडे आगार प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून, प्रवाशांना अनेक सुविधांपासून वंचित ठेवले जात असल्याच्या तक्रारी जिल्हाधिकारी कार्यालयाला प्राप्त झाल्या होत्या. याच तक्रारींची दखल घेत आज जिल्हाधिकाऱ्यांनी बसस्थानकाला भेट देऊन पाहणी केली आणि आगार प्रशासनाला सूचना दिल्या.

जिल्हाधिकारी वर्षा मीना यांना अकोला शहराच्या मध्यवर्ती बसस्थानकावर प्रवाशांसाठी असलेल्या सुविधांच्या कमतरतेबाबत अनेक तक्रारी मिळाल्या होत्या. या तक्रारी आणि नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज अकोला शहराच्या मुख्य बसस्थानकाला अचानक भेट दिली.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी संपूर्ण बसस्थानकाची बारकाईने पाहणी केली. जिल्हाधिकाऱ्यांच्या या आकस्मिक भेटीमुळे आगारात कार्यरत असलेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची मोठी धावपळ उडाली. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी मध्यवर्ती बसस्थानकावरील स्वच्छतागृह, प्रवासी सुविधा, प्रवासी वाहतूक व्यवस्थापन आणि प्रवाशांच्या सुरक्षेच्या मुद्द्यांचा आढावा घेतला आणि संबंधित अधिकाऱ्यांना कडक निर्देश दिले.

?यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, 'जिल्हा प्रशासन नागरिकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुलभ सेवा देण्यासाठी कटिबद्ध आहे.' जिल्हाधिकाऱ्यांच्या या धडक कारवाईमुळे आगार प्रशासनात चांगलीच खळबळ उडाली आहे.

**अमूल्य कळ्या**

**वाढदिवस**



कु. शार्वी पंकज इंगळे
रा. चरणगाव


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135



CMYK CMYK